नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १४० | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. २० एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### मुख्याधिकाऱ्यांवर गोळीबार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नेवासा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी निखिल फराटे यांच्यावर गोळीबार केल्याच्या आरोपावरून संजय लक्ष्मण सुखदान (रा. नेवासा) याच्याविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय सुखदान हे नेवासा नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षांचे पती आहेत. मुख्याधिकारी निखिल फराटे यांनी अहिल्यानगर शहरातील तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा दाखल करून तो तपासासाठी नेवासा पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्याची माहिती नेवासा पोलीस ठाण्याचे निरीक्षक महेश पाटील यांनी सांगितले. आरोपी संजय सुखदान याचा शोध घेत असल्याची माहिती त्यांनी दिली. गोळीबाराची घटना दि. १३ एप्रिलच्या रात्री पावणेआठच्या सुमारास घडली. मात्र मुख्याधिकारी फराटे यांनी काल, शनिवारी सायंकाळी तोफखाना पोलिसांकडे फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा दाखल करून तो नेवासा पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. आपण घाबरलो असल्याने लगेच तक्रार दिली नाही, असे मुख्याधिकारी फराटे यांनी नमूद केले आहे.

### रेल्वे प्रवाशांसाठी डोकेदुखी!

अकोला (स. गांवकरी) : रेल्वेच्या स्वयंचलित ब्लॉक प्रणालीचे काम होणार असल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे. अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या असून काही गाड्या विलंबाने धावणार आहेत. वेळापत्रक कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागामार्फत पारस – गायगाव – अकोला विभागात अप व डाऊन दोन्ही मार्गांवर स्वयंचलित ब्लॉक प्रणाली बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या पायाभूत सुविधांच्या कामांच्या पार्श्वभूमीवर भुसावळ – बडनेरा विभागात काही रेल्वे गाड्या तात्पुरत्या स्वरूपात रद्द, तर काही गाड्या विलंबाने धावणार आहेत. २३ एप्रिल रोजी प्रवासी गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होणार आहे. २३ एप्रिल रोजी गाडी क्रमांक ११११२१ भुसावळ ते वर्धा मेमू, गाडी क्रमांक ६१११०२ बडनेरा ते भुसावळ मेमू, गाडी क्रमांक ६१११०१ भुसावळ बडनेरा मेमू, गाडी क्रमांक १११२२ वर्धा ते भुसावळ मेमू या गाड्यांचे रद्दीकरण केले आहे.

### हेमामालिनी थेट गडकरींच्या घरी

नागपूर (स. गांवकरी) : केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने नागपूरजवळील धापेवाडा येथे 'धापेवाडा टेक्सटाईल' प्रकल्पांतर्गत सिल्क साडीनिर्मिती उद्योग सुरू करण्यात आला आहे. या साडीला खूप मागणी असल्याचे नेहमी जाहीरपणे आपल्या भाषणातून सांगतात. रविवारी अभिनेत्री व खासदार हेमामालिनी यांना गडकरी यांनी सिल्क साडीच्या निर्मिती प्रक्रियेपासून तर बाजारात येईपर्यंतची प्रक्रिया सांगितली. सुप्रसिद्ध अभिनेत्री तसेच खासदार हेमा मालिनी यांनी रविवारी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी नितीन गडकरी व कांचन गडकरी यांनी धापेवाडा येथील होतकरू महिलांनी हातमागावर विणलेली करवत काठी साडी हेमा मालिनी यांना भेट दिली. यावेळी गडकरी यांनी धापेवाडा येथील सूती साडीला जकाटची बॉर्डर करण्याचे काम सुरू असल्याचे व या प्रकल्पातून नागपूरसह विदर्भाला सूती हातमाग व पॉवरलूम साडीची ओळख देण्याचा प्रयत्न असल्याचे हेमामालिनी यांना सांगितले. विशेष म्हणजे मागील वर्षी जुलैमध्ये अॅग्रोव्हिजनच्या एका कार्यक्रमात गडकरींनी हेमामालिनी यांना या टेक्सटाईल प्रकल्प पाहण्यासाठी आमंत्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले होते.

# आसिफ अन्सारीकडून सर्वाधिक छळ

## "हिंदू महिला बुरखा घालत नसल्याने त्यांच्यावर बलात्कार होतात"

**नाशिक : (स. गांवकरी)**

नाशिक येथील टीसीएसच्या बीपीओत काम करणाऱ्या एका महिलेने तिचा पाठलाग, चुकीच्या पद्धतीने स्पर्श करणं आणि लैंगिक शोषण याबाबत भाष्य केलं आहे. तिच्या पाच सहकाऱ्यांनी तिच्या धर्माला म्हणजेच हिंदू धर्माला कशी नावं ठेवली आणि आपल्याला त्यावरुन कसं टार्गेट केलं तेदेखील या महिलेने सांगितलं आहे. याबाबत या महिलेने पोलिसात तक्रार दिली आहे. पीडितेने दिलेल्या जबाबानुसार या महिलेने २० जून २०२५ ला टीसीएसच्या नाशिकमधील बीपीओत नोकरी करण्यास सुरुवात केली होती. २४ जून २०२५ ला शाहरुख कुरेशी आणि आणखी एका सहकाऱ्यासह तिचं ट्रेनिंग सुरु झालं. तिने रझा मेमन या टीम लीडवरही आरोप केले आहेत. या महिलेने सांगितल्या नुसार रझा मेमन लोन विभागाचा टीम लीड होता, त्याचा या महिलेच्या ट्रेनिंगशी काही संबंध नव्हता. तरीही तो वारंवार ट्रेनिंग रुममध्ये यायचा. तो सदर महिलेला विचाराचा की तुझा पती जर बाहेर गेला असेल तर घरात एकटी कशी काय राहतेस तुला भीती वाटत नाही का? तुला कधी गरज असेल तर मला बोलव, मी तुझ्या घरी यायला तयार आहे. त्याने या महिलेला प्लेअर असं नाव दिलं होतं. ऑफिसमध्ये सगळ्यांच्या देखतही



तो या महिलेला प्लेअरच संबोधायचा. तसंच सातत्याने तो या महिलेशी तिचं लग्न, तिचा पती आणि अश्लील संभाषण साधत होता. काही वेळा तर तो तिला म्हणाला की मी जर तुझा पती असतो तर कधीही बाहेर गेलो नसतो. गुढी पाडव्याच्या दिवशी साडी नेसून आल्यानंतर रझाने तिचा पदर पाठीमागून खेचला होता. त्यानंतर जेव्हा तिने त्याच्याकडे पाहिलं तेव्हा तो घाणेरड्या नजरेने तिच्याकडे पाहात होता आणि हसत होता. अशी तक्रार या पीडितेने दिली आहे. शाहरुख कुरेशीवरही या महिलेने आरोप केले आहेत. इंडिया टुडेने हे वृत्त दिलं आहे.

या महिलेने तिच्या तक्रारीत तिचा ट्रेनर शाहरुख कुरेशी याच्यावर आरोप केले आहेत. रझा मेमन जेव्हा माझ्याशी अश्लील बोलायचा तेव्हा त्या चर्चेत शाहरुखही सहभागी होत होता. तो त्याला बोलण्यासाठी प्रोत्साहन देत होता. तसंच शाहरुखही लग्नाबाबत अश्लील प्रश्न विचारत होता. आसिफ अन्सारी नावाच्या टीम लीडरवरही या महिलेने आरोप केले आहेत. आसिफ अन्सारीही वेगळ्या टीममध्ये होता. पण तो जाणुनबुजून माझ्याजवळ येऊन बसायचा. मुद्दाम मला कुठल्या तरी कारणाने स्पर्श करायचा. त्याने माझा हात पकडण्याचा प्रयत्न केला. तसंच मांडीवर आणि खांद्यावर हात ठेवला होता. एकदा तर त्याने माझ्या पोटावर हात ठेवला आणि म्हणाला की तू तर झीरो फिगर आहेस. एक दिवस आसिफ अचानक आला त्याने मला पाठीमागून मिठी मारली. मी त्याला जोरदार धक्का दिला आणि तिथून पळाले असं या महिलेने तक्रारीत सांगितलं.

> आसिफ वासनांध नजरेने मला बघत होता. तसंच माझ्या अंतर्वस्त्रांबाबतही तो प्रश्न विचारत होता. तुझ्या घरी नवरा नसेल तेव्हा मला बोलव, कुणाला काही कळणार नाही. दिवाळीच्या वेळी तो मला म्हणाला की तू साडी नेसून ये, मी तुला साडीत पाहू इच्छितो. मला माहीत आहे की तू हॉट आणि सेक्सी दिसशील. असं या महिलेने तिच्या तक्रारीत म्हटलं आहे. आसिफ अन्सारी तिला म्हणाला होता की हिंदू धर्मात महिलांवर बलात्कार होतो कारण त्या बुरखा घालत नाहीत. तसंच हिंदू देवी देवतांबाबतही अपमानजनक वक्तव्यं आसिफने केली होती असाही आरोप सदर पीडितेने तिच्या तक्रारीत केला आहे. तसंच तुझ्या काही शारिरीक गरजा असतील तर मला सांग मी त्या तुझ्या घरी येऊन भागवेन असंही अन्सारी म्हणाला होता असं या महिलेने तिच्या तक्रारीत म्हटलं आहे.

# महिला आरक्षण विधेयकावरून राज्यात कलगीतुरा...



**मुंबई : (स. गांवकरी)**

देशाच्या संसदेत नामंजूर झालेल्या महिला आरक्षण विधेयकावरुन राज्यातील महायुती व महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये कलगीतुरा सुरु होता. राज्यातील लाडक्या बहीणींनी महाविकास आघाडीला धडा शिकवला आहे. आता देशातील लाडक्या बहीणी इंडिया आघाडीला धडा शिकवतील, असे भाकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. 'खासदारांची संख्या वाढवून सत्तेचा अमरपट्टा कायम ठेवण्याचे भाजपचे षडयंत्र विरोधकांनी उधळून लावले. मोदी यांना खोटे बोलण्याचा आजार झाला आहे, अशी बोचरी टीका शिवसेना ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांनी केली. महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाले. त्यानंतर राज्यातील महायुती, महाविकास आघाडीतील नेत्यांच्यात आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. प्रमुख नेत्यांच्या टीका टिप्पणीनंतर आता दुसऱ्या फळीतील नेत्यांनी टीकेची धार कायम ठेवली आहे. महिला आरक्षण विधेयक हे एक राजकीय षडयंत्र होते. ते कोसळले.

> महिला आरक्षणाच्या आडून घटना दुरुस्ती करण्याचा भाजपचा प्रयत्न होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे महिला विषयी बोल म्हणजे मगरीचे अश्रू आहेत, अशी टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. राज्यात महिला आरक्षण सर्मथक आणि विरोधक असे दोन तट पडले आहेत.

मोदी आणि त्यांच्या मंडळाच्या घसरणीची ही सुरुवात आहे. १६ खासदारांच्या जोरावर मोदी यांचे पंतप्रधान पद टिकले आहे. १६ आकडयाचा चमत्कार होईल असे भाकीत राऊत यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाविरोधात केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तक्रार झाल्यानंतर विरोधकांच्या पायाच्या खालची वाळू सरकली आहे,असे सांस्कृतिक मंत्री अॅड अशिष शेलार यांनी म्हटले आहे. काँग्रेस आघाडीने महिलांचा अपमान केला आहे, असा आरोप महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

# राज्यातील १८ हजार इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळा 'रडार'वर

**पुणे : (स. गांवकरी)**

'राज्यातील इंग्रजी माध्यमांच्या शाळा मराठी भाषा विषय शिकवतात की नाही, याची तपासणी लगेचच सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी गटशिक्षणाधिकारी स्तरापासूनच्या अधिकाऱ्यांचे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध आहे,' अशी माहिती राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी दिली. राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठी राज्य सरकारने २०२०मध्ये अधिनियम केला. त्यानंतर १ जून २०२० रोजीच्या शासननिर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून राज्यातील सर्व शाळांमध्ये पहिली ते दहावीपर्यंत टप्प्याटप्प्याने मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याचा आदेश देण्यात आला. अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या शाळांना एक लाख रुपयांपर्यंतचा दंड, शाळेची मान्यता किंवा ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची तरतूद करण्यात आली. मात्र, खासगी संस्थांच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवली जात नसल्याची बाब निदर्शनास आल्याने संबंधित शाळांची मान्यता, ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यासाठीची कार्यपद्धती शालेय शिक्षण विभागाने निश्चित केली. त्यानुसार, मराठी न शिकवणाऱ्या शाळांची मान्यता, ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचे अधिकार शिक्षण आयुक्तांना देण्यात आले आहेत. शिवाय, मराठी भाषा विषय पात्रताधारक शिक्षक नियुक्त करण्याचा आदेशही शाळांना देण्यात आला आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
महाराष्ट्र शासन

# काँग्रेसनेच हिरवे विषारी साप पोसून ठेवले

## नवनीत राणा यांचे वडेट्टीवार यांना प्रत्युत्तर

**अमरावती : (स. गांवकरी)**

माजी खासदार नवनीत राणा या जात आणि धर्मात भांडण लावून सत्तेची पोळी कशी शेकता येईल, यासाठी पाणी घालून जिवंत ठेवण्यात येणारी विषवल्ली आहे, अशी टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी आज नागपुरात बोलताना केली. त्यावर प्रत्युत्तर देताना 'अशा चिल्लर लोकांच्या वक्तव्यांवर मला बोलण्याची गरज नाही, पण जेव्हा नाशिकमध्ये टीसीएस प्रकरण उघडकीस आले, तेव्हा वडेट्टीवार यांची जीभ का वळवळली नाही,' असा सवाल नवनीत राणा यांनी केला.



नवनीत राणा म्हणाल्या, काँग्रेसने हिरवे विषारी साप पोसून ठेवले आहेत, म्हणून एवढे वळवळ करतात. हे सर्व प्रकार आता कुठे उघडकीस येत आहेत. काँग्रेसच्या कार्यकाळात या हिरव्या विषारी सापांना जपण्याचे काम आणि असे प्रकार दडपण्याचे काम काँग्रेसने केले होते. पण, आता ही सर्व प्रकरणे बाहेर निघत आहेत. आता या सर्व हिरव्या सापांना ठेचण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे करणार आहेत. यांना आम्ही सोडणार नाही. पण, हे जे चिल्लर लोक बोलताहेत, त्यांनी आधी आपल्या घरात पाहिले पाहिजे. नवनीत राणा म्हणाल्या, महिला आरक्षण विधेयकाला विरोध करून काँग्रेसने आपली मानसिकता दाखवून दिली आहे. यांना महिलांचा किती सन्मान आहे, हे संपूर्ण देशाने, जगाने पाहिले आहे. वास्तविक महिलांना पाठिंबा देण्याची गरज असताना त्यांनी कसा पळ काढला, हे सर्वांना समजले आहे. त्यामुळे या चिल्लर लोकांनी आम्ही काय केले पाहिजे, हे सांगू नये. हिरव्या विषारी सापांना ठेचण्याचे काम आम्ही करणारच. महिलांविषयी बोलण्याच्या आधी काँग्रेसच्या नेत्यांनी आपल्या घरातही पाहिले पाहिजे. त्यांच्या घरी सुद्धा मुली आहेत.

परतवाडा येथील प्रकरणात बुरख्यावाल्या नव्हत्या, असे नवनीत राणा कोणत्या आधारावर बोलल्या. तोंडात आले की काहीपण वाफा काढायच्या का? या बाईची जीभ जातीयवादी आणि धर्मांध बनली आहे. लोकांनी निवडणुकीत पाडून जिरवली तरी अजून शुद्धीवर यायला तयार नाही. राणा यांना हनुमान चालीसाच्या दोन ओळी बोलता येत नाही. त्या हिंदू धर्माच्या गोष्टी बोलत आहेत, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली होती. खरात प्रकरणावर ब्र न काढणाऱ्या नवनीत राणा मुस्लिम तरुण दिसल्याबरोबर बावचाळल्यासारखी बोलतात, असेही ते म्हणाले होते.

# महाराष्ट्राच्या वारकरी परंपरेचा 'जागतिक गौरव'

## 'छोटा वारकरी' या उपक्रमाने वेधले संपूर्ण जगाचे लक्ष

**पुणे : (स. गांवकरी)**

महाराष्ट्राची समृद्ध वारकरी परंपरा आणि एकविसाव्या शतकातील प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यांचा अभूतपूर्व संगम असलेल्या 'छोटा वारकरी' हा उपक्रम सध्या तंत्रज्ञान विश्वात चर्चेचा विषय ठरत आहे.

या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण प्रयोगासाठी पुण्याच्या वारीव्हर्स स्टुडिओज या स्टार्टअपने 'मास्टर्स युनियन नेक्स्ट टेक १.० एआय शिखर परिषद' मध्ये मानाचा 'क्रिएटिव्ह ल्यूमिनरी अॅवॉर्ड पटकावला आहे. वारीव्हर्स स्टुडिओजचे संस्थापक स्वप्नील मोरे आणि सह-संस्थापक पूजा मोरे यांना या जागतिक स्तरावरील व्यासपीठावर सन्मानित करण्यात आले.

या स्टार्टअपच्या 'छोटा वारकरी' या उपक्रमाने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. शतकानुशतके चालत आलेली अभंगवाणी, संतांचे विचार आणि वारकरी संस्कार नव्या पिढीला समजेल अशा रंजक भाषेत मांडण्यासाठी मोरे यांनी एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'छोटा वारकरी' या अभिनव अॅनिमेशन व्यक्तिरेखेचे उद्‌घाटन नुकतेच झाले होते.

या यशाबद्दल बोलताना स्वप्नील मोरे म्हणाले, 'हा सन्मान केवळ आमचा नसून संपूर्ण वारकरी परंपरेचा आहे. 'याचा धरीन अभिमान, करीन आपुले जतन' या उक्तीप्रमाणे आपली संस्कृती जागतिक स्तरावर नेण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. एआय हे केवळ साधन नसून ते भविष्यातील संवादाचे सशक्त माध्यम आहे.' पूजा मोरे म्हणाल्या, 'छोटा वारकरी हा आमच्यासाठी केवळ एक प्रकल्प नाही. तर, तो एक भावनिक प्रवास आहे. या पुरस्कारामुळे आम्हाला अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे.' माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात कार्यरत असलेल्या वारीव्हर्स स्टुडिओजला भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया उपक्रमांतर्गत मान्यता मिळाली आहे. भारतीय सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी तंत्रज्ञानाचा असा वापर हे आत्मनिर्भर भारताच्या दिशेने पडलेले



एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. या पुरस्कारामुळे केवळ महाराष्ट्राच्या नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक वैभवाचा डंका जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात वाजला आहे. पारंपारिक भक्ती मार्ग आता डिजिटल युगात 'स्मार्ट' पद्धतीने प्रवाहित होत आहे, हेच या यशाने सिद्ध केले आहे.

गेल्या १५ वर्षांपासून 'फेसबुक दिंडी' आणि 'व्हर्च्युअल दिंडी'च्या माध्यमातून वारीचा प्रचार करणारे स्वप्नील मोरे यांनी या संकल्पनेची निर्मिती केली आहे. युवा पिढीला आपल्या मुळांशी जोडण्यासाठी 'छोटा वारकरी' या पात्राची निर्मिती करण्यात आली आहे. एआय आधारित कथाकथन, अॅनिमेशन आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून लहान मुलांवर आध्यात्मिक व नैतिक संस्कार करण्याचे कार्य हे स्टार्टअप करत आहे. केवळ मनोरंजन नाही, तर मूल्यांची जोपासना हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

# 'झेड प्लस' सुरक्षेचा खर्च सरसंघचालकाकडूनच वसूल करा

**नागपूर : (स. गांवकरी)**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आणि सरसंघचालक मोहन भागवत यांना पुरवण्यात येणाऱ्या झेड प्लस व्हीव्हीआयपी सुरक्षेचा खर्च करदात्यांच्या पैशातून केला जात आहे. यामुळे सरकारी तिजोरीवर भार पडत असून हा खर्च सरसंघचालक यांच्या कडूनच वसूल करण्यात यावा, अशा आशयाची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली आहे. केंद्र सरकारचे गृहमंत्रालय, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ), राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आणि राज्य शासनाच्या वित्त विभागाला प्रतिवादी करण्यात आले आहे. याचिकेवर सोमवार, २० एप्रिल रोजी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी होणार आहे. याचिकेनुसार, आरएसएस ही नोंदणीकृत संस्था नसूनही तिला झेड प्लस दर्जाची सुरक्षा पुरवली जात आहे. या सुरक्षेचा खर्च करदात्यांच्या पैशातून केला जात असल्याने राज्याच्या तिजोरीवर मोठा आर्थिक भार पडत आहे. एका महिन्याचा हा खर्च सुमारे ४० ते ४५ लाख रुपये इतका असल्याचा दावा करण्यात आला आहे. याचिकाकर्त्याने २७ फेब्रुवारी २०२३ रोजी सर्वोच्च न्यायालयाने



केंद्र सरकार विरुद्ध बिकाश साहा प्रकरणात दिलेल्या निर्णयाचा आधार घेतला आहे. या निर्णयानुसार, झेड प्लस सुरक्षा देताना त्याचा खर्च संबंधित व्यक्तीकडून वसूल करणे अपेक्षित आहे. मात्र, या प्रकरणात त्या आदेशाची अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. याचिकाकर्त्याने १२ फेब्रुवारी २०२६ आणि २७ फेब्रुवारी २०२६ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना लेखी निवेदने दिली होती. करदात्यांचा पैसा वसूल करण्याची मागणी करण्यात आली होती; मात्र कोणतीही कारवाई न झाल्याने अखेर न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. याचिकेत उच्च न्यायालयाकडे प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. आरएसएस कडून झेड प्लस सुरक्षेचा खर्च तातडीने वसूल करण्याचे आदेश द्यावेत तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या २०२३ च्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास निर्देश द्यावेत, आदी मागण्या याचिकेत करण्यात आल्या आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### प्राथमिक शाळेत शिक्षण घेऊनही अत्युच्च यशाला गवसनी घालता येते

राजगुरुनगर (स. गांवकरी) : प्राथमिक शाळेत शिक्षण घेऊनहि अत्युच्च यशाला गवसनी घालता येते,याबत न्यूनगंड बाळगण्याचे कारण नाही असे प्रतिपादन, प्रथम वर्ग न्यायदं डाधिकारी पदी निवड झालेले, मंगेश धोत्रे यांनी राजगुरूनगर येथे केले.महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून येथील मंगेश आंनदराव धोत्रे यांची प्रथम वर्ग न्यायदंडा धिकारी पदी निवड झाली याबद्दल त्यांचा सत्कार, त्यांनी शिक्षण घेतलेल्या राजगुरूनगर प्राथमिक शाळा क्रमांक १ यांच्या वतीने करण्यात आला यावेळी धोत्रे बोलत होतें.शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक राजेश कांबळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होतें यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर कडलक, रेटवडी शाळेचे मुख्याध्यापक जालिंदर दिघे शाळेच्या माजी शिक्षिका अश्विनी घुमटकर, सुजाता दिघे, माजी विध्यार्थी प्राध्यापक आशिष कदम, सुरज खंडागळे, गणेश राक्षे, गणेश रावळ पदवीधर शिक्षक द. मा. पिंगळे, विठ्ठल खेडकर, जयसिंग उकिर्डे, स्मिता पवळे, गीता सांगडे व शिक्षक उपास्थित होतें. आईवडील आणि शिक्षक हेच आपले खरे हितचिंतक असतात. सातत्त्याने प्रयत्न केल्यास यश नक्कीच मिळते प्राथमिक शाळेतील शिक्षण संस्कारक्षम व आयुष्याला आकार देणारे असते असेही धोत्रे यावेळी म्हणाले. प्राध्यापक सुरज खंडागळे, मुख्याध्यापक राजेश कांबळे यांनी मुलांना मार्गदर्शन केले सर्वसामान्य कुटुंबातील मंगेश धोत्रे यांनी कुठल्याही मार्ग दर्शनाशिवाय मिळवलेले हे यश अभिमानास्पद व इतर विध्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक असल्याचे शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक राजेश कांबळे यांनी सांगितले. राष्ट्रीय पारितोषिक विजेते पदवीधर शिक्षक द. मा. पिंगळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले मुख्याध्यापक ज्ञानेश्वर कडलक यांनी आभार मानले.

### १९ एप्रिल रोजी श्री भगवान परशुरामाची भव्य पायी शोभायात्रा

अहिल्यानगर (स. गांवकरी) : भगवान श्री परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त श्री परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने आज रविवार (दि. १९) एप्रिल रोजी भव्य पायी शोभायात्रा सायं. ४.३० ते ६.३० रेणुकामाता मंदिर (प्रोफेसर कॉलनी चौक) ते भिस्तबाग चौक, सावेडी येथे होणार असून भगवान श्री परशुराम जन्मोत्सवाची सांगता होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष समर्थभक्त मंदारबुवा रामदासी असून आमदार संग्राम जगताप, आमदार गोपीचंद पडळकर हे उपस्थित राहणार आहेत. भगवान परशुराम जन्मोत्सवाचे प्रवचन ह.भ.प. कुं. रेणुकाताई निसळ यांचे होणार असून महाआरती सांगता होईल. तरी जास्तीत जास्त महिला व ज्ञाती बांधवांनी मोठ्या संख्येने सामील व्हावे असे आवाहन संयोजन समिती केला आहे.

### पुणे जिल्हा परिषद अर्थसमिती सदस्यपदी नेहाताई पाटे यांची निवड



नारायणगाव (स. गांवकरी) : नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सौ. नेहाताई योगेश उर्फ बाबू भाऊ पाटे यांची जिल्हा परिषद सदस्या म्हणून नियुक्ती झाली होती. त्यानंतर त्यांची पुणे जिल्हा परिषद अर्थ समिती सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. नक्कीच ही निवड अत्यंत योग्य असून जुन्नर तालुक्यातील जनतेला न्याय देणारी ठरेल. अर्थ समितीच्या माध्यमातून तालुक्यात मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून गती मिळेल. त्यामुळे जुन्नर तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला निश्चितच नवी चालना मिळेल.त्यामुळे नेहाताई पाटे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### वनजमिनी वर बेकायदेशीर विहीर खोदकाम; चौकशी करण्याची मागणी



तामसा (स. गांवकरी) : हदगांव तालुक्यातील खारटवाडी कोंढुर वनजमिनीवर बेकायदेशीर विहीर खोदकाम केल्याप्रकरणी शासनाची दिशाभूल केली असं आरोप करत राजु देवडे यांनी संबंधित वनविभागात निवेदन देऊन तक्रार करून चोकशी ची मागणी केली विस्तृत माहितीनुसार खारटवाडी (कोंडुरं )शिवारात वनजमिनी गट क्र.25 मध्ये कोशल्याबाई बालाजी शेम्बटवाड यांनी त्याचा नावावरील वनविभागाच्या पट्यावर वनविभागाचे वनरक्षक व शेतकऱ्यांनी संगणमताने अवैध विहिरीचा खोदकामात शासनाची दिशाभूल करून एमआरजीएस अभियंता यांना हाताशी धरून बेकायदेशीर विहीरखोदकाम करून घेत असल्याची तक्रार संबंधित विभागात राजु देवडे यांनी करून चॊकशी ची मागणी केली.. @ संबंधित शेतकऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी राजू देवडे यांनी वन विभाग हादगाव येथे केली, सदरील जमिनीवर संबंधित शेतकऱ्याचा नावाने सातबारा असून शासनाच्या आदेशाप्रमाणे खोदकाम करताना संबंधित विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र अनिवार्य असून कागदी कारवाई न करता सरल खोदकाम सुरू केल्याची तक्रार केली आहे.

### अध्यक्षपदी पत्रकार आनंद मोरे तर उपाध्यक्षपदी बंटी मोरे यांची निवड

अर्धापूर (स. गांवकरी) : अर्धापूर तालुक्यातील मौजे बारसगांव येथे महामानव, विश्वरत्न प्रज्ञासूर्य क्रांतीसुर्य भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व परमपूज्य भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त सार्वजनिक उत्सव साजरा करण्यासाठी नुकतीच एक बैठक घेण्यात आली. या बैठकीत नवीन कार्यकारिणी ची निवड करण्यात आली असून जयंती मंडळ अध्यक्षपदी आनंद मोरे ,उपाध्यक्षपदी बंटी मोरे अर्धापूर वंचित बहुजन आघाडी चे ता अध्यक्ष विनय उर्फ बंटी हिरामण मोरे व कोषाध्यक्ष तानाजी वाघमारे सचिव ॲड राजरत्न सितळे सहसचिव देवा वाघमारे संघटक माधव मोरे सदस्य भिमराव मोरे शामराव वाघमारे हिरामण मोरे खंडोजी वाघमारे गोतम सितळे सुनिल शामराव मोरे ग्यानोजी ताटे नामदेव ताटे कामाजी मोरे कोंडीबा मोरे काशीनाथ मोरे शंकर ताटे नागेश सितळे दगडू मोरे रुकेक्ष वाघमारे बबलु ताटे बाबासाहेब एडके संघर्ष सुरज धुताडे सुरेश ताटे गंगाप्रसाद वाघमारे श्रीरंग वाघमारे पुरभाजी ताटे राजु ताटे मिलिंद ताटे पुरभाजी वाघमारे प्रभु ताटे नवनाथ ताटे जयपाल मोरे तथागत मोरे अजय मोरे विजय मोरे प्रकाश धुताडे माधव जमदाडे बापुराव कोलते भय्या ताटे शामराव कांबळे,अक्षय वाघमारे आकाश पिराजी ताटे मोरे महेंद्र ताटे सोपनिल मोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विश्वरत्न प्रज्ञासूर्य क्रांतीसुर्य भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व परमपूज्य भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती १४ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ पर्यंत विविध गायन पार्टी मोठ्या प्रमाणात प्रबोधनकार पदाधिकारी सहभागी होणार आहेत कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित रहावे.

# विकास लवांडेचा श्रीराम सेवा मंडळाच्या वतीने निषेध

नेवासा : (स. गांवकरी)




महाराष्ट्रातील वीसहून अधिक संत महंत यांना घुसखोर म्हणून पत्रकार परिषद व सोशल मीडियाद्वारे बेताल वक्तव्य करणाऱ्या राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या विकास लवांडेचा श्रीराम सेवा मंडळाच्या वतीने त्रिव शब्दात निषेध करण्यात आला.सदर व्यक्तीवर कायदेशीर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नेवासा तालुक्यातील देवगाव,भेंडा व देवगड भक्त परिवार व श्रीराम सेवा मंडळाच्या भाविकांनी नेवासा तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना निवेदनाद्वारे केली आहे यावेळी देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की गुरुवारी दिनांक १६ एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विकास लवांडे नामक व्यक्तीने सामाजिक न्याय व्यवस्था व स्वास्थ्य संकटात यावे म्हणून तसेच हिंदू धर्मियांच्या धार्मिक भावना दुखाविण्याच्या हेतूने राज्याचे वैभव असलेल्या वारकरी संप्रदायातील विविध साधू,संत महंत यांची नावे घेऊन त्यांना घुसखोर सारखा शब्द वापरून प्रचंड मोठा अपमान केला आहे. यामुळे प्रचंड रोष सकल हिंदू समाजाच्या मनामध्ये निर्माण झाला आहे. या व्यक्तीला अटक न झाल्यास प्रचंड मोठ्या प्रमाणावर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल हे याद्वारे कळवू इच्छितो व याची जबाबदारी सर्वस्वी प्रशासनाची राहील असा ईशारा दिला आहे नेवासा तालुक्यासह पूर्ण महाराष्ट्राला पूजनीय असणाऱ्या देवगड देवस्थानचे परमपूजनीय महंत श्री भास्करगिरीजी बाबा यांच्यासह इतर १९ संत महंत यांच्या बाबत कोणताही विचार न करता, कागदोपत्री पुरावा न देता, कोणत्याही सक्षम न्यायालयांचे निर्णय न घेता, मनाला वाटेल तसे बोलण्याचा अधिकार म्हणून समाजाचे सामाजिक स्वास्थ्य खराब होऊन कायद सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे वक्तव्य विकास लवांडे याने केले आहे. त्यामुळे या नालायक प्रवृत्तीच्या विकास लवांडे याच्याविरुद्ध तहसील प्रशासनाने व पोलिस प्रशासनास हाताशी स्वतः हून फिर्याद नोंदवून घ्यावी व कठोर कारवाई करावी अन्यथा भविष्यात होणाऱ्या विविध आंदोलन, मोर्चे व त्यातून निर्माण होणाऱ्या कायदे सुव्यवस्थेचे प्रश्वास आपण दोन्ही प्रशासन जबाबदार राहतील असा ईशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी श्रीराम भक्त मंडळाचे देवगाव व भेंडे व देवगड भक्त परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुविधांसाठी सुलोचना काकडे यांचे महापालिकेला निवेदन

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१९ (वसरणी-कौठा) परिसरातील विविध नागरी समस्यांबाबत नगरसेविका सुलोचना धोंडीबाराव काकडे यांनी महापौर व आयुक्तांकडे निवेदने सादर करून तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. जुना कौठा पोलीस चौकी ते रविनगर या रस्त्याला सन १९९७ मध्ये महानगरपालिका महासभेने मंजुरी दिल्यानुसार "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मार्ग" असे नामकरण करण्यात आले होते. रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामादरम्यान सदर नामफलक काढण्यात आल्याने तो ३१ मे रोजी होणाऱ्या अहिल्यादेवी होळकर जयंतीपूर्वी पूर्ववत बसविण्यात यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.जुना कौठा नवीन कौठा मित्र नगर साईबाबा मंदिर परिसर

तसेच प्रभागातील सिडको, संभाजी चौक, भिमवाडी, असर्जन, धुमाळवाडी, जयप्रकाशनगर, वसरणी आदी भागांमध्ये अनेक वर्षांपूर्वी बसविण्यात आलेले पथदिवे बंद पडले असून नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित भागांमध्ये सुमारे २०० नवीन एलईडी पथदिवे उपलब्ध करून तातडीने बसविण्याची मागणी आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

## भाजपाचे शक्तिप्रदर्शन; विकास संकल्प सभेत कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

डांग, गुजरात: (स. गांवकरी)




डांग जिल्ह्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले आहे. विविध पक्षांचे स्टार प्रचारक मैदानात उतरत असल्याने प्रचाराला वेग आला आहे. अशा परिस्थितीत आहवा येथे भाजपाच्या वतीने विकास संकल्प सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला राज्याचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी उपस्थित होते.सभेला मोठ्या संख्येने भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित राहिले होते, त्यामुळे वातावरणात उत्साह आणि जोश दिसून आला. डांग जिल्हा भाजपाध्यक्ष किशोरभाई गावित यांनी विश्वास व्यक्त करत सांगितले की आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये भाजपाला भव्य विजय मिळेल. डांगचे आमदार विजयभाई पटेल यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करत सर्व जागांवर विजय मिळवण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले. त्यांनी ही विजयाची कामगिरी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना समर्पित करण्याचेही सांगितले. तसेच विकासाच्या मुद्द्यावर कमळ चिन्हाला मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले. गुजरात प्रदेश आदिवासी मोर्चाचे अध्यक्ष गणपतभाई वसावा यांनी स्थानिक स्वराज्य निवडणुका या लोकशाहीचा उत्सव असल्याचे सांगितले. त्यांनी कॉंग्रेस आणि आम आदमी पक्षावर टीका करत दोन्ही पक्ष डांगमधील जनतेला दिशाभूल करत असल्याचा आरोप केला. भाजपाच्या कारभारात शिक्षण, पाणी, रस्ते यांसारख्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकास झाल्याचा दावा त्यांनी केला. उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांनी आपल्या भाषणात आदिवासी समाजाला वंदन करत आपण माता शबरीच्या पवित्र भूमीत आल्याचा अभिमान व्यक्त केला. त्यांनी सांगितले की भाजप सरकारने डांग जिल्ह्यात पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या क्षेत्रात व्यापक विकास केला आहे. कॉंग्रेसवर टीका करत त्यांनी सांगितले की त्यांच्या सत्ताकाळात लोकांना पाण्यासाठी लांब अंतर पार करावे लागायचे, तर आता घराघरात पाणी पोहोचले आहे.या सभेदरम्यान साकरपातळ परिसरातील कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते भाजपात प्रवेश करत भगवा धारण केला, त्यामुळे राजकीय वातावरण आणखी तापले.

## सुलोचना डांगरा यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त तुलादान व सहस्रचंद्रदर्शन सोहळा उत्साहात संपन्न!





अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील नामांकित उद्योजक तथा आत्मा मलिक ट्रस्टचे संचालक सुनील शेठ डांगरा यांच्या मातोश्री श्रीमती सुलोचना रमेशचंद्र डांगरा यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त तुलादान व सहस्रचंद्रदर्शन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. परमपूज्य गुरुदेवांच्या कृपेने आयोजित हा सोहळा शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मालपाणी रिसॉर्ट येथे संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे आणि महिला ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या संचालिका परीघा आरोटे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सुलोचना डांगरा यांचा सन्मान करण्यात आला. या शुभ प्रसंगी कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार व स्नेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. धार्मिक व पारंपरिक विधींनी युक्त असा हा सोहळा अत्यंत आनंदात साजरा करण्यात आला. उपस्थितांची उपस्थिती हीच कुटुंबासाठी अनमोल भेट असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे आयोजन सुनिल रमेशचंद्र डांगरा व सर्वेश सुनिल डांगरा यांच्या वतीने करण्यात आले होते. विशेष म्हणजे, कोणतेही भेटवस्तू स्वीकारण्याऐवजी आत्मा मलिक ध्यानपीठ येथे वस्तू दान करण्याचा निर्णय डांगरा परिवाराने घेतला. तसेच यावेळी आजीबाईंची पेढे तुला करण्यात आली असून आत्मा मलिक ध्यानपीठ समूहाच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

## बेकायदेशीर बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करावी

जामखेड तालुका : (स. गांवकरी)

जामखेड शहरात अनाधिकृत रित्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांचा शोध घेऊन त्यांच्या तातडीने प्रभावी कारवाई व्हावी यासाठी भाजपच्या वतीने जामखेड शहर मंडल अध्यक्ष संजय काशिद यांच्या कडुन तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. तसेच या बेकायदेशीर रहाणाऱ्या नागरिकांना देशाबाहेर हद्दपार करावे असे देखील या निवेदनात म्हटले आहे. भाजपच्या वतीने शहर मंडल अध्यक्ष संजय काशिद यांनी तहसीलदार धनंजय बांगर यांना पुढे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की जामखेड शहर तसेच तालुक्यात काही ठिकाणी अनाधिकृतरित्या वास्तव करणारे परदेशी (बांगलादेशी) नागरीक रहात असल्याची माहिती मिळत आहे. अशा अनाधिकृत वास्तव्यामुळे कायदा व सुव्यवस्था, स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न तसेच शासनाच्या नियमांचे उल्लंघन होण्याची शक्यता निर्माण होत आहे. त्यामुळे संबधित यंत्रणांच्या माध्यमातून विषेश शोध मोहीम राबवून जामखेड शहरात संशयित अनाधिकृत रहिवाशियांची तपासणी करण्यात यावी. जे नागरिक बेकायदेशीर कागदपंत्राशिवाय वास्तव्य करत आहेत त्यांच्यावर योग्य ती कारवाई करुन त्यांना देशाबाहेर हद्दपार करावे अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन देतावेळी भाजपचे जामखेड शहर मंडल अध्यक्ष व नगरसेवक संजय काशिद, उपनगरध्याक्ष पोपट राळेभात, नगरसेवक प्रा. विकी घायतडक, ॲड. प्रविण सानप, तात्याराम पोकळे, मोहन पवार, हर्षद काळे, प्रविण होळकर, मनोज कुलकर्णी, प्रविण चोरडिया, पवन राळेभात, महेश मासाळ, ज्ञानेश्वर अंदुरे, मोहन गडदे, मनोज गडदे, ऋषिकेश मोरे, विठ्ठल राळेभात, बाळासाहेब गायकवाड व राम हुलगुंडे उपस्थित होते.

# महापुरुषांच्या विचारांचा संगम म्हणजे समताधिष्ठित समाजरचना

## अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ : शिव-फुले-आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव साजरा

जामखेड : (स. गांवकरी)



छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची संकल्पना रुजवून जनतेला स्वाभिमान दिला. महात्मा फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विषमता दूर करण्यासाठी आयुष्य वेचले, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेद्वारे समानता, स्वातंत्र्य व बंधुता या मूल्यांची भक्कम पायाभरणी केली. या तिन्ही महापुरुषांच्या विचारांचा संगम म्हणजे समताधिष्ठित समाजरचना असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. जामखेड येथे शुक्रवारी शिव-फुले-आंबेडकर संयुक्त जयंती कार्यक्रम अयोजीत केला होता. यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री भुजबळ बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेसही पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

या कार्यक्रमास विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच आमदार काशिनाथ दाते, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, माजी आमदार भीमराव धोंडे, नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष महेश निमोणकर, तालुका उपाध्यक्ष बापुराव शिंदे, गायक उत्कर्ष शिंदे आदी उपस्थित होते. मंत्री छगन भुजबळ म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य अत्यंत उत्तुंग आणि प्रेरणादायी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यक्रांती घडवून आणत सर्व जाती-धर्मातील मावळ्यांना एकत्र करून सुराज्याची मुहूर्तमेढ रोवली. शेतकऱ्यांना आधार देत न्यायप्रिय आणि लोककल्याणकारी राज्यकारभार केला. अन्यायाविरुद्ध त्यांनी आयुष्यभर लढा दिला. महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजक्रांती घडवून शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील विषमता दूर करण्यासाठी आयुष्य वेचले. बहुजनांसाठी शिक्षणाची दारे खुली करून सामाजिक परिवर्तनाचा पाया रचला. त्यांच्या द्विशताब्दी वर्षाचे औचित्य साधून संपूर्ण देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या आयुष्यात ३२ पदव्या प्राप्त करून ज्ञानाची उंची गाठली. त्यांनी संविधानाच्या माध्यमातून समाजातील दीन, दलित आणि शोषित घटकांच्या हक्कांचे संरक्षण करत प्रत्येक नागरिकाला समान अधिकार बहाल केले. मतदानाचा अधिकार देत लोकशाही अधिक मजबूत केली आणि देशाला विकासाच्या दिशेने नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. आपला महाराष्ट्र हा याच महापुरुषांच्या विचारांवर आधारित असून सर्वांना एकत्र घेऊन प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे मंत्री भुजबळ यांनी सांगितले.

नव्या पिढीने महापुरुषांच्या विचारांचा अभ्यास करून समाज परिवर्तनात सक्रिय सहभाग घ्यावा - सभापती प्रा. राम शिंदे सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचे सुशासन, महात्मा फुले यांचे शिक्षणविस्ताराचे कार्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक न्यायाचे तत्त्वज्ञान आजही तितकेच मार्गदर्शक आहे. नव्या पिढीने या महान विचारांचा अभ्यास करून समाज परिवर्तनात सक्रिय सहभाग घ्यावा. अशा उत्सवांमधून सकारात्मक आणि प्रेरणादायी विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचत असल्याचे ते म्हणाले. यावेळी आमदार काशिनाथ दाते, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचीही समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संध्या सोनवणे यांनी केले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेसही पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

# थोडक्यात पण महत्वाचे



## नागवडे स्कूलची १००% निकालाची परंपरा कायम

■ गुणवंत विद्यार्थ्यांसह पालकांचा सत्कार संपन्न

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) इयत्ता दहावीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून शिवाजीराव नागवडे डॅफोडिल्स स्कूलच्या विद्यार्थ्यांनी १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशानिमित्त शाळेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा छोटेखानी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.यावेळी बोलताना पालकांनी सांगितले की, शाळेचे सूक्ष्म नियोजन, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची मेहनत यामुळेच हे यश शक्य झाले आहे. वर्षभर राबविण्यात आलेल्या विविध गुणवत्तापूर्ण उपक्रमांचे हे फलित असल्याचे नमूद करत त्यांनी शालेय प्रशासनाचे आभार व्यक्त केले. इयत्ता दहावीच्या परीक्षेत अनुक्रमे प्रथम पाच विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत — प्रद्युम्न भोस (९४.२०%), श्रुतिका कसरे (९०.८०%), सर्वज्ञा भोर (८८.६०%), श्रद्धा वाळके (८२.२०%) आणि यश जाधव (८१.२०%). या प्रसंगी तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे, विश्वस्त अनुराधाताई नागवडे, निरीक्षक एस. पी. गोलांडे, मुख्याध्यापिका नीतू दुलानी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.




## कार्यालयीन कामकाजाची पाहणी

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : चाईल्ड फंड इंडिया या संस्थेच्या वरिष्ठ अधिकारी समितीने बुधवार दि:-१५ एप्रिल रोजी जुन्नर तालुक्यातील केंद्रांना फील्ड व्हिजिट करून प्रत्यक्ष कार्यालयीन कामकाजाची पाहणी करण्यात आली.या भेटीसाठी चाईल्ड फंड इंडियाचे एकूण २९ वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यामध्ये चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर आनंद विश्वकर्मा,प्रकल्प संचालक श्रीमती शारबंती सेन तसेच विविध विभागांचे मॅनेजर्स आणि स्टेट हेड यांचा समावेश होता. या भेटीदरम्यान जुन्नर प्रकल्पातील महत्त्वाच्या विषयांवर आधारित (थीमॅटिक) कामांची पाहणी करण्यात आली त्यामध्ये हेल्थ,एज्युकेशन, लिव्हलीहूड,क्लायमेट चेंज आणि चाईल्ड प्रोटेक्शन या घटकांचा समावेश होता. संपूर्ण टीमचे पाच गट करण्यात आले होते आणि प्रत्येक गटामध्ये ५ ते ७ सदस्य होते. प्रत्येक गटाने वेगवेगळ्या गावांना भेट देऊन सुरू असलेल्या कामांची आणि त्यांच्या अंमलबजावणीची प्रत्यक्ष पातळीवरील माहिती घेतली.या भेटीत प्रामुख्याने मराडवाडी,देवळे,सितेवाडी खुबी-करंजाळे,कोळवाडी,व मांडवे या गावांमध्ये घेण्यात आल्या. विविध गटांनी स्थानिक स्तरावरील उपक्रम,त्यांचे परिणाम व प्रकल्पाचा एकूण प्रभाव याबाबत सखोल माहिती संकलित केली.यावेळी संस्थेचे चीफ एक्झिक्युटिव्ह आनंद विश्वकर्मा व ग्रीन क्लब व वॉश क्लब प्रकल्प प्रमुख पूनम मिश्रा यांनी आपल्या पाच सहकाऱ्यां सह मराडवाडी येथील केंद्राला भेट दिली व विविध प्रकल्पांची पाहणी करून पालक,विद्यार्थी, व ग्रामस्थ यांच्याशी संवाद केला यावेळी जिल्हा परिषद सदस्य अंकुशशेठ आमले,राजेश दाभाडे,पराग जगताप,संतोष पाडेकर,दिपाली जगताप, नलावडे सर,संस्थेचे ब्रँड अँबिसेटर रविंद्र भोर उपस्थित होते. या निरीक्षणांच्या आधारे जुन्नर चाईल्ड फंड इंडिया मढ पारगाव संस्थेच्या पुढील दिशा निश्चित केली जाईल आणि जुन्नर भागातील आगामी कामकाजाची रणनीती ठरवली जाईल अशी माहिती वरिष्ठ प्रकल्प अधिकारी अभिजित मदने व समन्वयक अजित सॊर यांनी दिली.

## परसबागेतील वांग्याच्या एका झाडाला दोन दिवसात दहा किलो वांगी



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : उदापुर ता:- जुन्नर येथील जेष्ठ पत्रकार तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष आणि दैनिक समर्थ गावकरीचे जुन्नर तालुका प्रतिनिधी रविंद्र भोर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून तालुक्यात लोकप्रिय आहेत ते सतत नवनवीन प्रयोग करून समाजापुढे एक आदर्श निर्माण करीत असतात त्यांना विविध क्षेत्रातील अनुभव असल्याने अनेक एनजीओ संस्थेच्या माध्यमातून महिलांना सक्षमीकर ण करण्यासाठी,विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करण्यासाठी, आरोग्य,मानसशास्त्र,खेळ इत्यादी विषयांवर त्यांची व्याख्याने लोकप्रिय झाली आहे. यामध्ये तालुक्यातील महिला बचतगट,ग्रामसंघातील महिलांना शेती पूरक,शेतीवर आधारित आणि कुटिरोद्योग, लघुउद्योग,स्वयं शेती व्यतिरिक्त व्यवसाय या संबंधात मार्गदर्शन करून त्यांना स्टार्टअप निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन करतात. यामध्ये सध्याची शेती ही पुर्णतः रासायनिक खतांचा वापर करून केली जात आहे.त्यामुळे अनेक आजारांनी लोकांना ग्रासले आहे परिणामी मानव जात धोक्यात आली आहे. यावर उपाय म्हणून सेंद्रिय पद्धतीने शेती करणे गरजेचे आहे.

## मातापूरमध्ये जगदंबा माता यात्रा उत्सवाचा जल्लोष

वडाळा महादेव (स. गांवकरी) : मातापूर येथील जागृत देवस्थान आणि नवसाला पावणारे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री जगदंबा माता (मावलया) यांचा वार्षिक यात्रा उत्सव नुकताच मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. धार्मिक विधी, भव्य कुस्ती स्पर्धा आणि लावणीचा बहारदार कार्यक्रम अशा वैविध्यपूर्ण उपक्रमांनी या उत्सवाची सांगता झाली. उत्सवाची सुरुवात बुधवारी रात्री ८ वाजता मानाचा पाळणा व विधीवत पूजेने झाली. त्यानंतर देवीचा भव्य छबीना मिरवणूक सोहळा पार पडला. मंगळवारी रात्री देखील विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. देवीच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केल्याने संपूर्ण मंदिर परिसर 'आई साहेबांच्या' जयघोषाने दुमदुमून गेला होता. कुस्तीचे मैदान आणि बक्षिसांची लयलूट यात्रेचे मुख्य आकर्षण ठरलेल्या भव्य कुस्ती स्पर्धा बुधवारी सायंकाळी ५ वाजता पार पडल्या. या मैदानातील विजेत्या मल्लांना ५ सायकली देऊन गौरवण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते हे पारितोषिक वितरण करण्यात आले. कुस्ती पाहण्यासाठी पंचक्रोशीतील कुस्तीशौकिनांनी मोठी गर्दी केली होती. सायली पाटील यांच्या लोकगीतांनी उडवला फवारा यात्रेची विशेष सांगता प्रसिद्ध लावणी कलावंत सायली पाटील यांच्या बहारदार कार्यक्रमाने झाली. त्यांच्या लोकगीतांनी आणि नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. या सांस्कृतिक कार्यक्रमाने यात्रेमध्ये अधिकच रंगत आणली.

# 'यशोगाथा उत्तमापूरची, ओळख ओतूरची' प्रकाशन सोहळा

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील ग्रामविकास मंडळाचे माजी अध्यक्ष श्री माधवराव भाऊसाहेब डुंबरे लिखित यशोगाथा उत्तमापूरची अर्थात ओळख ओतूरची या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवार दिनांक १८ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता पांढरी मारुती मंदिर खुले व्यासपीठ याठिकाणी दिमाखदार पद्धतीने पार पडला.

यावेळी सीमा सोनवणे, माजी आमदार दिलीपराव ढमढेरे, माजी आमदार अतुल बेनके, गणपतराव फुलवडे, जिल्हा परिषदेच्या सदस्या छाया तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, ह.भ.प. गंगाराम महाराज डुंबरे, शरद चौधरी, निलम तांबे, तुषार थोरात, धनंजय डुंबरे, संगीता वाघ, शिल्पा मोरे, रंगनाथ घोलप, ह.भ.प. हरड महाराज जेष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.




सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन झाले. त्यानंतर पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी मनोगतातून माधवराव डुंबरे यांच्या कार्याचे कौतुक करत पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

ओतूर नगरीचे ऋषींतुल्य व्यक्तिमत्व माधवराव भाऊसाहेब डुंबरे यांनी आपल्या वयाच्या ९० व्या वर्षी उत्तमापूर ते ओतूर असा रंजक ऐतिहासिक खुणाची साक्ष असणारा हा प्रवास, गेल्या चार पाच वर्षापासूनचे अथक परिश्रम, अव्याहतपणे केलेले वाचन, चर्चा, तसेच त्यांनी प्रत्यक्ष अनुभवलेली व्यक्तिमत्व, त्यांचे जुने अनुभव हे या पुस्तकातून मांडले आहेत.

या पुस्तकाच्या बांधणीसाठी ओतूरच्या ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रश्मी घोलप, संपादकीय मंडळातील डॉ. भरत घोलप, सुनील वैद्य, शोभा टिकेकर, मंदाताई दांगट यांचे सहकार्य लाभले. अतिशय अभ्यासपूर्ण माहिती व सुंदर असं शब्दांकन असणार हे पुस्तक नक्कीच शिवजन्मभूमीतील भावी पिढीला प्रेरणा देणार असल्याचे उपस्थित ग्रामस्थांनी सांगितले. प्रास्ताविक गंगाराम महाराज डुंबरे, सूत्रसंचालन विठ्ठल शितोळे यांनी केले. आभार दिपक डुंबरे यांनी मानले.

उत्तमापूर म्हणजे ओतूर, पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील एक महत्वपूर्ण ऐतिहासिक गाव. अनेक ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार असणाऱ्या या पुण्यभूमीचा इतिहास खूप जुना व रंजक आहे.

जगतगुरु संत तुकाराम महाराज यांचे गुरु बाबाजी चैतन्य महाराज यांची संजीवन समाधी, महर्षी व्यासस्पर्शीत कपर्दिकेश्वर मंदिर, महात्मा ज्योतिबा फुले यांचे सहकारी, सत्यशोधक भाऊ कोंडाजी डुंबरे यांची जन्मभूमी, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरु केलेली मुलींची चौथी शाळा, गावातील पुरातन अवशेष, इतिहासाची साक्ष असणाऱ्या गावातील तीन वेशी, घराघरात असणारे आड, मोकळ्या बखळी, जुने कलात्मक वाडे, अशा अनेक खुणांचा मागोवा या पुस्तकात संचित केलेला आहे. तसेच ओतूर नगरीचे कोहिनुर हिरे सॉलिसीटर दास्ताने, जेष्ठ साहित्यिक, पत्रकार सदा डुंबरे, स्वातंत्र्य सैनिक नानासाहेब हांडे-देशमुख, कविवर्य शंकर वैद्य, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार सुभाष अवचट, दूरदर्शन वरील आमची माती, आमची माणसं कार्यक्रमाचे निर्माते अशोक डुंबरे, सुप्रसिद्ध साहित्यिक अनिल अवचट, प्रवचनकार बालयोगी महाराज, सरोजनी वैद्य, इतिहासकार ओतूरकर, अशा अनेक महान व्यक्तिमत्वाचा कार्याची माहिती व त्यांचा जीवनपट या पुस्तकात रेखाटला गेला आहे.

## एसटी स्टँड येथे जुन्नर ते ठाणे अचानक बस ने घेतला पेट

शिवनेरी : (स. गांवकरी)

जुन्नर नवीन एसटी स्टँड येथे जुन्नर ते ठाणे बस क्र. एम एच २० / जी सी / ४७८७ , शुक्रवार , दिं १७ एप्रिल दुपारी २ वाजून ३० मि. अचानक पेट घेतला . यावेळी बस मध्ये प्रवासी नसल्याने मोठा अनर्थ टाळला . याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की , बस स्थानक फलट क्र.२ दोन वर बस बंद करून उभी होती . चालक गणेश शंकर लवाटे चा. क्र. २९३३ बसची नोंद करण्यासाठी तर वाहक सुरेश रामचंद्र वंडेकर वा. क्र. ५९३८७ आरक्षण मेमो आणण्यासाठी वाहतूक नियंत्रण कक्षेत आले. यावेळी बसच्या समोर उभ्या असणाऱ्या प्रवाशांनी बसचे केबिन मधून धूर येत असल्याने ओरडा ओरडा सुरू केली. बस स्थानकावरील सर्व चालक व वाहतूक नियंत्रण यांनी बस स्थानकावरील अग्निशमन उपकरण व पाण्याच्या बादल्या घेऊन चालक



व प्रवासी दरवाजा उघडून आग विझवण्याचा आटोक्यात प्रयत्न केला. याप्रसंगी जुन्नर नगरपरिषद अग्निशमन बंब घटनास्थळी आल्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. सदर घटनेत बसची १, लाख २५ हजार रुपये चे नुकसान झाले आहे असे संबंधित अधिकारी यांच्याकडून माहिती सांगण्यात आली.

## रेती माफियांवर पोलिसांची धडाकेबाज कारवाई

नायगाव : (स. गांवकरी)

नायगाव इज्जतगाव येथे (ता. नायगाव) जवळील गोदावरी नदीपात्रात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीवर कुंटुर पोलीस स्टेशन व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी संयुक्त छापा टाकून रेती माफियांना मोठा धक्का दिला. ही कारवाई १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी २ वाजता गोपनीय माहितीच्या आधारे करण्यात आली असून, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार (आयपीएस) यांच्या मार्गदर्शनाखाली 'ऑपरेशन फ्लश आऊट' अभियानांतर्गत राबवण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी तीन हायवा ट्रॅक्टर-ट्रॉली (MH-२६-B-९९२९, MH-२६-CH-२०६५, MH-४३-BP-१०५७), भगवा रंगाची टाटा जेसीबी व एक फायबर बोट जप्त केली. यातील रेतीसह एकूण मुद्देमालाचे मूल्य १ कोटी ७० लाख ७५ हजार रुपये इतके आहे. याप्रकरणात बहु-निर्देशित अधिनियम (बि.एन.एस.)



**१.७० कोटींचा मुद्देमाल जप्त!**

कलम ३०३(२), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. तीन हायवा वाहने (प्रत्येकी अंदाजे ३० लाख रुपये); त्यात ७ ब्रास काळी व सामान्य रेती (एकूण १.४० कोटी). भगवा टाटा जेसीबी (५० लाख रुपये); उत्खननासाठी वापर. रेती काढणीसाठी (२० लाख रुपये). अटक आरोपीया प्रकरणात १२ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल असून, ९ जणांची नावे उघड झाली:

उर्वरित तीन 'अज्ञात इसम'. सहभागी अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर, सहाय्यक स पो नी विशाल भोसले, यांच्या मार्गदर्शनाखाली सुनिल जाधव, गजानन तोटेवाड यांच्या नेतृत्वात सपोउपनि लक्ष्मण सोनकांबळे (फिर्यादी), रामदयालसिंह ठाकुर, पोहेकॉ पांडुरंग शिंदे, पोना माधव पल्लेवाड, पोकॉ भंडारे, लिंबाळे, मेंडके उपस्थित होते. ही कारवाई नांदेड पोलिसांच्या अवैध रेतीविरोधी सतत चालू असलेल्या लढ्याचा भाग असून, रेती माफियांचे कंबरडे मोडण्यासाठी पुढील कारवाया वाढवण्यात येतील, असे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी व सा पो. विशाल भोसले स्पष्ट केले.

## पाल वनक्षेत्रात वनविभागाचा दणका



**३ हेक्टरवरील अतिक्रमण हटवून जमीन केली मुक्त**

रावे : (स. गांवकरी)

सातपुड्याच्या पर्वत रांगांमधील पाल वनक्षेत्रात वनजमिनीवर डल्ला मारणाऱ्यांविरुद्ध वन्यजीव वनविभागाने आक्रमक पवित्रा घेतला असून, एका मोठ्या कारवाईत सुमारे ३ हेक्टर क्षेत्रावरील अतिक्रमण जमीनदोस्त केले आहे. लोहारा नियतक्षेत्रातील कक्ष क्र. ३९ मध्ये करण्यात आलेल्या या धाडसी कारवाईमुळे वनक्षेत्र बळकावणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी रूमसिंग फूलसिंग पावरा याने वनविभागाच्या राखीव वनक्षेत्रात बेकायदेशीररीत्या नांगरटी करून अतिक्रमण केले असल्याचे वनविगाच्या लक्षात आले होते.

एवढेच नव्हे तर पावसाळ्याचे निमित्त साधून या जमिनीवर पेरणीदेखील पूर्ण केली होती. वनविभागाच्या गस्ती पथकाला या प्रकाराची कुणकुण लागताच त्यांनी तातडीने वरिष्ठ स्तरावर अहवाल सादर केला. उपवनसंरक्षक कृष्णा भवर व सहायक वनसंरक्षक सत्यजित निकत यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ कारवाईचे आदेश दिले. दिनांक १४ रोजी रात्रीच्या सुमारास वनपरिक्षेत्र अधिकारी शीतल नगराळे यांच्या नेतृत्वाखाली वनविभागाच्या पथकाने मोहिमेला सुरुवात केली. रात्रीची वेळ आणि दुर्गम भाग असूनही जेसिबीच्या सहाय्याने संपूर्ण रात्रभर ही मोहीम राबवण्यात आली. अतिक्रमणधारकाने केलेली नांगरटी उलटवून लावत सुमारे ३ हेक्टर जमीन पुन्हा वनविभागाच्या ताब्यात घेतली. भविष्यात या जमिनीवर पुन्हा कोणीही अतिक्रमण करू नये, यासाठी या क्षेत्राच्या चोहोबाजूंनी खोल 'चारी' खोदून सीमांकन करण्यात आले आहे. या प्रक्रियेनंतर ही जमीन आता पुन्हा एकदा नैसर्गिक वनक्षेत्राच्या रूपात पुनरुज्जीवित होणार आहे.

या यशस्वी मोहिमेत वनपाल संभाजी सूर्यवंशी, रजनी घोडके, मोहसीन तडवी, रणधीर काटे, समीर तडवी, संजय बारेला, जगदीश बारेला, राजमल बारेला, रियाज तडवी, सकीना तडवी, धनाबाई भादले, सविता बारेला व दीपक बारेला यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. वनविभागाच्या या 'सर्जिकल स्ट्राईक'मुळे परिसरात खळबळ उडाली आहे. "वनसंपदेचे नुकसान करणाऱ्यांची गय केली जाणार नाही आणि भविष्यातही अशाच प्रकारची कठोर कारवाई सुरू राहील," असा कडक इशारा प्रशासनातर्फे देण्यात आला आहे.

## ढवळगावच्या सुपुत्राची महाराष्ट्र पोलीस दलात निवड

श्रीगोंदा : (स. गांवकरी)



ढवळगाव येथील सुपुत्र दत्तात्रय बाळासाहेब शिंदे यांची महाराष्ट्र पोलीस दलात मुंबई लोहमार्ग या घटकात उत्कृष्ट गुणांसह निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल पंचक्रोशीतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. दत्तात्रय शिंदे यांनी गेल्या आठ वर्षांपासून अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यांनी २०१७ साली पहिला प्रयत्न केला होता. मात्र, प्रत्येक वेळी अत्यंत कमी फरकाने यश हुलकावणी देत राहिले. मागील वर्षी नवी मुंबई येथे केवळ एका गुणाने ते प्रतीक्षा यादीत राहिले होते. तरीही न खचता त्यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न सुरू ठेवले आणि यंदा मोठ्या फरकाने यश मिळवत आपले स्वप्न साकार केले. दत्तात्रय शिंदे यांनी एका यशावर समाधान न मानता भविष्यात उपविभागीय पोलीस अधिकारी (DYSP) होण्याचे ध्येय ठेवले असून त्यासाठी तयारी सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. शैक्षणिक आणि स्पर्धा परीक्षांसोबतच ते वैयक्तिक आयुष्यात उत्कृष्ट टेनिस क्रिकेटपटू म्हणूनही ओळखले जातात. तसेच त्यांना पत्रकारितेचीही आवड आहे. ते माजी तंटामुक्ती अध्यक्ष बाबासाहेब शिंदे यांचे नातू आहेत. त्यांच्या या यशामुळे ढवळगावसह परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# नंदकुमार कुरुमकर यांची राज्य शिक्षकेतर महासंघाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी निवड

श्रीगोंदा: (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्याचे सुपुत्र, शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू व संयमी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेल्या नंदकुमार कुरुमकर यांची राज्य शिक्षकेतर महासंघाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. महासंघाचे राज्याध्यक्ष वाल्मीक सुरासे यांनी त्यांच्या निवडीवर अधिकृत शिक्कामोर्तब केले.

श्री कुरुमकर यांनी गेली ३८ वर्षे महासंघात प्रामाणिकपणे कार्य करत संघटनेला बळकटी दिली आहे. १९९२ पासून ते महासंघात सक्रिय असून, राज्याध्यक्ष वाल्मीक सुरासे व माजी अध्यक्ष एस. डी. डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी सातत्याने योगदान दिले. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर बुलंद



आवाज म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. माध्यमिक शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात त्यांनी प्रसिद्धीच्या माध्यमातून शासनाचे वेळोवेळी लक्ष वेधले. त्यांच्या पुढाकारामुळे अनेक मागण्या मार्गी लागल्या आहेत. यामध्ये १२ वर्षांनंतर वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ, २४ वर्षांची आश्वासित प्रगती योजना, नाईक पदावरील अन्याय, शिक्षकेतरांचा नवीन आकृतीबंध आणि त्यातील त्रुटी, तसेच २००५ पासून बंद असलेल्या अनुकंपा तत्वावरील भरतीचा प्रश्न आदी मुद्द्यांचा समावेश आहे. २००६ मध्ये औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीदरम्यानच्या राज्यव्यापी आंदोलनातही त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला होता. सध्या राज्यातील शिक्षकेतरांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर राज्याध्यक्ष वाल्मीक सुरासे यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा सुरू आहे.

श्रीगोंदा तालुका अध्यक्ष म्हणून काम करताना श्री कुरुमकर यांनी प्रत्येक विद्यालयाला भेट देऊन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि संस्था, विद्यालय व कर्मचारी यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य केले. संघटनेचे महत्त्व पटवून देण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न शिक्षकेतरांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. श्री कुरुमकर हे ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमादरम्यानच राज्याध्यक्ष सुरासे यांनी त्यांच्या प्रसिद्धी प्रमुखपदी निवडीची घोषणा केली. त्यांच्या या नियुक्तीमुळे महासंघाच्या कार्याला अधिक गती मिळेल, तसेच शिक्षकेतरांच्या प्रश्नांना शासन स्तरावर अधिक प्रभावीपणे मांडता येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

या निवडीमुळे श्रीगोंदा तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून, राज्य कार्याध्यक्ष केशव पाटील, राज्य सचिव पाराजी मोरे, माजी अध्यक्ष एस. डी. डोंगरे, मार्गदर्शक समशेर पठाण, राजू पठाण, परशुराम वेताळ, अविनाश चढगुलवार, भाऊसाहेब धनवटे, सतीश बडदे, अशोक आळेकर, तौसिफ शेख, सदाशिव काटेकर, राजकुमार चैनानी, सुनील म्हस्के, किशोर जामदार आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# अखात्रीज सणाची अनोखी परंपरा; पारंपरिक खात्री

**डांग, गुजरात : (स. गांवकरी)**



डांग जिल्ह्यातील निसर्गपूजक आदिवासी समाजाने अखात्रीज हा पवित्र सण पारंपरिक पद्धतीने उत्साहात साजरा केला. या प्रसंगी आदिवासी बांधवांनी आपल्या पूर्वजांची पूजा करून येणाऱ्या वर्षात कोणते पीक घ्यावे याची पारंपरिक पद्धतीने खात्री केली.

डांगी आदिवासींसाठी अखात्रीज हा अत्यंत महत्त्वाचा सण मानला जातो. वर्षाच्या शेवटी येणारा हा सण "शेवटचा सण" म्हणूनही ओळखला जातो, कारण अखात्रीजनंतर नवीन वर्षाची सुरुवात होते. जंगल आणि निसर्गाशी घट्ट नाते असलेल्या या समाजासाठी निसर्ग हा पूजनीय आहे आणि ते त्याच्याप्रती आपली श्रद्धा व्यक्त करतात. या सणादरम्यान आदिवासी आपल्या पूर्वजांना स्मरून त्यांच्या नावाने चुलीत अग्नी प्रज्वलित करतात, ज्याला पूर्वज देवपूजन मानले जाते. ही परंपरा त्यांच्या जीवनातील पूर्वजांचे महत्त्व दर्शवते. त्यामुळे अखात्रीजला पूर्वज पूजनाचा सण असेही म्हटले जाते. शेती हा आदिवासी समाजाचा मुख्य आधार असल्याने, अखात्रीजच्या दिवशी येणाऱ्या वर्षासाठी कोणते पीक योग्य राहील याचा पारंपरिक अंदाज घेतला जातो. वैशाख शुद्ध तृतीयेच्या दिवशी साजरा होणारा हा सण थेट शेतीशी जोडलेला आहे. अखात्रीजच्या सुमारे आठ दिवस आधी 'गवराई' पूजनाची विशेष परंपरा आहे. या विधीत बांबूच्या टोपलीत (डांगी भाषेत 'सेनुगली') माती भरून मका, नागली, उडीद, भात आणि ज्वारी अशी पाच प्रकारची धान्ये पेरली जातात. गवराई पूजनादरम्यान स्त्रिया पारंपरिक गीते गाऊन धार्मिक वातावरण निर्माण करतात.ही टोपली घराच्या एका कोपऱ्यात ठेवून बांबूने झाकली जाते आणि दररोज सकाळी विहीर किंवा नदीतून आणलेल्या शुद्ध पाण्याने त्यास पाणी दिले जाते. गवराईत उगवलेल्या धान्यांच्या वाढीवरून येणाऱ्या वर्षातील पिकांचा अंदाज लावला जातो, जे आदिवासी समाजाच्या प्राचीन कृषी परंपरेचे आणि निसर्गाशी असलेल्या घनिष्ठ नात्याचे प्रतीक आहे.

अशा प्रकारे डांग जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या सणांमधून त्यांची संस्कृती, परंपरा आणि निसर्गावरील अढळ श्रद्धा स्पष्टपणे दिसून येते.



ठाणे : ठाणे जिल्हा वृत्तपत्र विक्रेतासेनेचे संघटक श्री. अनिल (बाळु) भोसले यांचा वाढदिवस टेंभीनाका तेलीगळी येथे साजरा करण्यात आला. यावेळी जेष्ठ वृत्तपत्र विक्रेत्या जाधव काकी आणि वृत्तपत्र विक्रेतासेनेचे पदाधिकारी व वृत्तपत्र विक्रेते उपस्थित होते. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### ठाणे जिल्हा हौशी जलतरण संघटनेचा लोगो व वेबसाईटचे अनावरण

ठाणे **(स. गांवकरी)** : कै. मारोतराव शिंदे तरण तलाव, ठाणे येथे ठाणे जिल्हा हौशी जलतरण संघटनेच्या लोगो अनावरण सोहळा पार पडला. याच वेळी संघटनेच्या अधिकृत वेबसाईटचेही अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमास कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार व ठाणे जिल्हा हौशी जलतरण संघटनेचे अध्यक्ष ॲड. निरंजन डावखरे उपस्थित होते. या प्रसंगी आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक करत, "तंत्रज्ञानाच्या माध्यमातून क्रीडा संघटनांना अधिक व्यापक व्यासपीठ उपलब्ध होत आहे. अशा उपक्रमांमुळे खेळाडूंना अधिक संधी, मार्गदर्शन आणि ओळख मिळेल," असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास संघटनेचे उपाध्यक्ष व नगरसेवक श्री. राजेश मोरे, उपाध्यक्ष श्री. धनंजय कुलकर्णी, जलतरण तलाव उपव्यवस्थापक श्री. रवी काळे, प्रशिक्षक श्री. कैलास आखाडे तसेच क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील क्रीडा चळवळीला नवे बळ मिळत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. लोगो आणि वेबसाईटच्या माध्यमातून संघटनेची ओळख अधिक बळकट होणार असून, खेळाडूंना डिजिटल प्लॅटफॉर्मवरून माहिती, नोंदणी व मार्गदर्शन सुलभ होणार आहे. ठाणे जलतरण तलाव या ठिकाणाहून प्रशिक्षित होऊन अनेक लहान मुके व मुली, तरुणांनी, जलतरण प्रकारात राज्य, देश तसेच जागतिक पातळीवर देखील दैदीप्यमान यश मिळवले आहे. आजच्या ऑनलाईन युगात केवळ मोबाईल वर खेळ न खेळता युवकांना क्रीडा प्रकाराकडे आकर्षित होण्याची प्रेरणा मिळत असून अशा उपक्रमांमुळे ठाणे जिल्ह्याचा क्रीडा विकास अधिक वेगाने पुढे जाण्यास मदत होणार आहे. भविष्यातही खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचा विश्वास आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी व्यक्त केला.



### वेहळोली गावात प्रशिक संस्थेमार्फत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

खर्डी **(स. गांवकरी)** : "प्रशिक" संस्थेच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शैक्षणिक साहित्याचे वाटप शहापूर तालुक्यातील वेहळोली बौद्ध वाडा येथे करण्यात आला.तसेच स्पर्धा परीक्षांच्या शुल्कासाठी रक्कम रुपये 12000 हजार रुपयांचा धनादेश देऊन विद्यार्थ्यांना साहाय्य करण्यात आले. हा खरोखरच एक कौतुकास्पद उपक्रम आहे. अशा प्रयत्नांमुळे केवळ हुशार विद्यार्थ्यांच्या मेहनतीला आणि यशालाच मान्यता मिळत नाही, तर त्यांना जीवनात उच्च ध्येय ठेवण्यासाठी प्रेरणाही मिळते. आर्थिक आणि शैक्षणिक साहाय्य देऊन, ही संस्था विद्यार्थ्यांना अडथळे पार करून आत्मविश्वासाने त्यांच्या स्वप्नांकडे वाटचाल करण्यास मदत करत आहे हे एक उल्लंखनीय कार्य आहे. हा उपक्रम आपणास एक प्रबळ संदेश देतो की समाज, पात्र विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभा आहे आणि शिक्षणाला प्रगतीचा पाया मानतो. आज मिळालेले प्रोत्साहन निश्चितच अनेक विद्यार्थीनां कठोर परिश्रम करण्यास आणि शैक्षणिक तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यास प्रेरणा मिळेल.या कार्यक्रमास प्रशिक सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संस्थेचे अध्यक्ष यशवंत गायकवाड, संस्थेचे उपाध्यक्ष अशोक दूध सागरे, कार्याध्यक्ष बि.डी. जाधव, सरचिटणीस रंगनाथ गरुड व संस्थेचे इतर पदाधिकारी हजर होते. तसेच या कार्यक्रमासाठी सनी ग्रामस्थ पालक व शिक्षक वर्ग उपस्थित होते.

### तापमानात वाढ; कडक उन्हामुळे दुपारची वर्दळ कमी

वसमत **(स. गांवकरी)** : शहरासह परिसरात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून, एप्रिल महिन्याच्या मध्यावरच तापमानाने उच्चांक गाठण्यास सुरुवात केली आहे. सकाळपासूनच उन्हाची तीव्रता जाणवू लागते, तर दुपारच्या सुमारास उष्णतेचा कडाका अधिक वाढत आहे. परिणामी, दुपारच्या वेळेत शहरातील बाजारपेठा, मुख्य रस्ते आणि सार्वजनिक ठिकाणी नेहमीची वर्दळ लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत नागरिक शक्यतो घराबाहेर पडणे टाळत असून, अत्यावश्यक कामे सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा पूर्ण करण्याकडे कल वाढला आहे. त्यामुळे दुपारच्या वेळी शहरातील प्रमुख चौक, व्यापारी संकुले आणि रस्ते तुलनेने ओस पडलेले दिसत आहेत. काही भागांत तर दुपारी अगदी विरळच वाहतूक आणि हालचाल सुरू असल्याचे चित्र आहे. उष्णतेचा फटका व्यापारी व व्यावसायिकांनाही बसत असून, दुपारच्या सुमारास ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात घटल्याची माहिती स्थानिक व्यापाऱ्यांनी दिली. त्यामुळे काही दुकानदारांनी दुपारच्या वेळेत दुकाने अर्धवेळ बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. फेरीवाले आणि रस्त्यावरचे विक्रेतेही उन्हाच्या तीव्रतेमुळे कमी प्रमाणात दिसत आहेत.

# शिक्षक हा समाज परिवर्तनाचा घटक : ॲड. प्रताप ढाकणे

**पाथर्डी: (स. गांवकरी)**



प्राथमिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण असून, समाजाच्या जडण घडणीत प्राथमिक शिक्षक चा सिंहाचा वाटा असून शिक्षक हा समाज परिवर्तनाचा घटक असल्याचे प्रतिपादन एकलव्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड .प्रताप ढाकणे यांनी ग्रेड पात्र मुख्याध्यापक श्री. अशोकराव कराड जि. प.प्रा. शाळा, भिलवडे यांच्या सेवापूर्ती निरोप सोहळ्यात केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ॲड. अंकुश गर्जे हे होते. कार्यक्रमसाठी श्री .भीमराव फुंदे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, श्री गोकुळभाऊ दौंड, श्री गहिनीनाथ शिरसाठ, सरपंच सुरेश बडे, संजय बडे, श्री. रामनाथ कराड अधिक्षक शालेय पोषण, विस्तार अधिकारी अनिल भवार, निलेश क्षीरसागर, ह. भ.प रामगिरी महाराज, ह. भ. प गणेश महाराज प्रमुख पाहुणे अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रम प्रस्ताविक मध्ये श्री. रामनाथ कराड यांनी श्री.अशोक कराड यांची कौटुंबिक परिस्थिती, शालेय शिक्षण, सेवेची सविस्तर माहिती नमूद केली.

आपल्या अध्यक्षीय प्रमुख मार्गदर्शन मध्ये ॲड. अंकुश गर्जे यांनी तालुक्यातील प्राथमिक शाळेतील कार्य कौतुकास्पद असून अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात असले बाबत शिक्षण विभागाचे अभिनंदन करून जिल्हा परिषद च नाविन्यपूर्ण उपक्रम कुसुमाग्रज वाचनालयासाठी देणगी जाहीर केली. श्रद्धा अण्णा बडे ,सरपंच सुरेश बडे,संजय बडे, कवी कैलास बडे, स्मिता ढाकणे, अवनी ढाकणे, ज्योती तुपे/आधाट ,शिवाजी ढाकणे, ह .भ .प रामगिरी महाराज, गणेश महाराज यांनी सत्कार मूर्ती अशोक कराड यांच्या गौरवास्पद कार्याचा उल्लेख करून अभिनंदन केले. ग्रेड पात्र मुख्याध्यापक श्री अशोकराव कराड यांनी आपल्या यशस्वी कार्यात आपल्या कुटुंबाचा, मित्र परिवार व नातेवाईक यांचा मोठा वाटा असल्याचे निरोप सोहळा सत्काराला उत्तर देताना सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सविता खेडकर, अशोक देवकते, रुस्तुम बडे, मनीषा धायतडक, ज्योती आधाट, सागर कराड , मोहन आंधळे यांनी विशेष परिश्रम घेतले .सर्व प्राथमिक शिक्षक, संघटनेचे पदाधिकारी यांनी मेहनत घेतली.

कार्यक्रमासाठी बाळासाहेब गोल्हार, राजेंद्र जायभाये, अमोल ढाकणे, महेंद्र शिरसाट राहुलकुमार ढाकणे, अर्जुन शिरसाट, दिलीप बोरुडे, कल्याण लवांडे, शिक्षक बँक चे उपाध्यक्ष शिरसाट, सुनिल शिरसाट, सुनिल खेडकर, राजू गोल्हार, दीपक बडे, पत्रकार गर्जे, प्रेस प्रतिनिधी अक्षय वायकर मोठ्या संख्येने नातेवाईक उपस्थित होते.

# ३ हेक्टरवरील अतिक्रमण हटवून जमीन केली मुक्त

**रावे : (स. गांवकरी)**

सातपुड्याच्या पर्वत रांगांमधील पाल वनक्षेत्रात वनजमिनीवर डल्ला मारणाऱ्यांविरुद्ध वन्यजीव वनविभागाने आक्रमक पवित्रा घेतला असून, एका मोठ्या कारवाईत सुमारे ३ हेक्टर क्षेत्रावरील अतिक्रमण जमीनदोस्त केले आहे. लोहारा नियतक्षेत्रातील कक्ष क्र. ३९ मध्ये करण्यात आलेल्या या धाडसी कारवाईमुळे वनक्षेत्र बळकावणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी रूमसिंग फूलसिंग पावरा याने वनविभागाच्या राखीव वनक्षेत्रात बेकायदेशीररीत्या नांगरटी करून अतिक्रमण केले असल्याचे वनविगाच्या लक्षात आले होते. एवढेच नव्हे तर पावसाळ्याचे निमित्त साधून या जमिनीवर पेरणीदेखील पूर्ण केली होती. वनविभागाच्या गस्ती पथकाला या प्रकाराची कुणकुण लागताच त्यांनी तातडीने वरिष्ठ स्तरावर अहवाल सादर केला. उपवनसंरक्षक कृष्णा भवर व सहायक वनसंरक्षक सत्यजित निकत यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ कारवाईचे आदेश दिले. दिनांक १४ रोजी रात्रीच्या सुमारास वनपरिक्षेत्र अधिकारी शीतल नगराळे यांच्या नेतृत्वाखाली वनविभागाच्या पथकाने मोहिमेला सुरुवात केली. रात्रीची वेळ आणि दुर्गम भाग असूनही जेसिबीच्या सहाय्याने संपूर्ण रात्रभर ही मोहीम राबवण्यात आली. अतिक्रमणधारकाने केलेली नांगरटी उलटवून लावत सुमारे ३ हेक्टर जमीन पुन्हा वनविभागाच्या ताब्यात घेतली. भविष्यात या जमिनीवर पुन्हा कोणीही अतिक्रमण करू नये, यासाठी या क्षेत्राच्या चोहोबाजूंनी खोल 'चारी' खोदून सीमांकन करण्यात आले आहे.

# हुतात्मा अनंत कान्हेरे स्मृती शिल्पाचे अनावरण

**नाशिक : (स. गांवकरी)**



नाशिकची पवित्र भूमी ही केवळ धार्मिक परंपरांनीच नव्हे, तर स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतीकारकांच्या बलिदानानेही पावन झालेली आहे. या भूमीने देशाला हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे यांच्यासारखा प्रखर राष्ट्रभक्त दिला, असे प्रतिपादन आमदार प्रा. सौ. देवयानी सुहास फरांदे यांनी केले. हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे यांचा आज १९ एप्रिल स्मृतिदिन त्याचे औचित्य साधून अनंत कान्हेरे मैदान येथे त्यांचे स्मृती शिल्प उभारण्यात आले त्याचे अनावरण त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी, ज्या वयात स्वप्ने पाहिली जातात, त्या वयात कान्हेरे यांनी नाशिकचा तत्कालीन जुलमी कलेक्टर जॅक्सन याचा वध करून ब्रिटिश सत्तेला हादरा दिला. त्यानंतर त्यांनी हसत-हसत फासावर चढून मातृभूमीसाठी सर्वोच्च बलिदान दिले. नाशिकच्या स्वातंत्र्यलढ्यातील हे योगदान आणि क्रांतीकारकांचा शौर्यशाली इतिहास पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने 'हुतात्मा अनंत लक्ष्मण कान्हेरे स्मृती शिल्प' उभारण्यात आले असल्याचेही त्यांनी नमूद केले. हे स्मृती शिल्प केवळ एक कलाकृती नसून देशभक्तीचे जिवंत प्रतीक आहे, असे त्यांनी सांगितले. क्रांतीकारकांच्या बलिदानापुढे नतमस्तक होत त्यांना कोटी कोटी प्रणाम करण्यात आले. कार्यक्रमाला नगरसेवक श्री राजेंद्र आहेर, माजी नगरसेवक शिवाजी गांगुर्डे संघाचे कार्यवाह सुहास वैद्य सावरकर प्रेमी पंकज नागमोती, शैलेश पाराशरे, डॉ. गिरीश पिंपळे, चिन्मय खेडेकर, क्षेमकल्याणी, नाशिक क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन विनोद शहा सेक्रेटरी समीर रकटे भाजपा मध्य पश्चिम मंडळाचे अध्यक्ष वसंत उशीर , सुजाता करजगीकर, स्नेहल दगडे, रवींद्र गांगुर्डे, संगीता जाधव, अक्षय गांगुर्डे, अशोक सावंत, ज्यांनी ही कलाकृती केली ते रुचिर पंचाक्षरी, क्रिकेटर श्री व सौ भामरे स्थानिक नागरिक, पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिगवण गावात राष्ट्रीय भूमापन दिन उत्साहात साजरा

**इंदापूर : (स. गांवकरी)**



भिगवण (ता. इंदापूर, जि. पुणे) – महाराष्ट्रातील जमीन मोजणी व महसूल निश्चितीच्या शास्त्रशुद्ध प्रणालीची ऐतिहासिक सुरुवात ज्या भूमीतून झाली, त्या भिगवण गावात राष्ट्रीय भूमापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. १८१८ साली ब्रिटिशांनी पेशव्यांकडून सत्ता काबीज केल्यानंतर रयतवारी पद्धतीची अंमलबजावणी करताना इंदापूर तालुक्यातूनच जमीन मोजणी व महसूल निश्चितीची पायाभरणी करण्यात आली होती. पुढे हाच नमुना संपूर्ण महाराष्ट्रात लागू झाला, त्यामुळे भिगवणला विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर भिगवण स्टेशन परिसरात आयोजित राष्ट्रीय भूमापन दिन कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. इंदापूर भूमी अभिलेख कार्यालयाचे उपअधीक्षक सुशील पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना उपअधीक्षक सुशील पवार म्हणाले, "राज्याचे सचिव यांच्या नियोजनानुसार महाराष्ट्रात एकाचवेळी हा उपक्रम राबविण्यात आला. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या इंदापूर तालुक्यातील भिगवण येथे कार्यक्रम आयोजित करणे आमच्यासाठी प्रेरणादायी ठरले." पश्चिम महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला असून, पुणे जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट कार्यक्रम म्हणून भिगवण येथील उपक्रमाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी भिगवणचे सरपंच गुराप्पा पवार, डिकसळ ग्रामपंचायतीच्या सरपंच मनीषा गवळी यांच्यासह विविध गावांचे सरपंच व मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत इंदापूर भूमी अभिलेख कार्यालयाच्या कार्याचे कौतुक केले. विशेषतः उपअधीक्षक सुशील पवार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रलंबित व किचकट प्रकरणांना गती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

भूमी अभिलेख विभागातील नकाशे, उतारे व अन्य तांत्रिक बाबींमधील गुंतागुंतीच्या प्रश्नांचे निराकरण करण्यात सुशील पवार यांचा हातखंडा असून, अनेक शेतकऱ्यांना न्याय मिळाल्याने समाधान व्यक्त होत आहे. सर्वसामान्य नागरिकांना कोणताही भेदभाव न करता समान वागणूक देत तात्काळ सेवा देण्याची कार्यपद्धती त्यांनी रुजवली असल्याने तालुक्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. कार्यक्रमात प्रथमच इंदापूर भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आले. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमाला उपअधीक्षक सुशील पवार, सरपंच गुराप्पा पवार, सरपंच मनीषा गवळी, सदस्य कुंभार, दत्ता गायकवाड, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराजस्व अभियान हे लोकाभिमुख अभियान व्हावे : डॉ. मोहसिन शेख

**कर्जत : (स. गांवकरी)**



सर्वसामान्य जनता आणि शेतकरी यांचे महसूल विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाशी संबंधित दैनंदिन प्रश्न त्वरित निकाली काढण्याबरोबर नवीन महसूल सहितेतील तरतुदीची जनजागृती व्हावी, या उद्देशाने गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरणासाठी शासनाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' राबविण्यात येत असल्याने याचा जास्तीत जास्त लाभ लाभार्थ्यांनी घेतला पाहिजे, जेणेकरून हे अभियान लोकाभिमुख अभियान व्हावे, असे प्रतिपादन नोडल अधिकारी तथा कर्जतचे नायब तहसिलदार डॉ. मोहसिन शेख यांनी केले. कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान' शिबिराचे उदघाटन तहसीलदार मोहसीन शेख आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन समारंभ कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले. या शिबिरात जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील आणि तहसिलदार रवी सतवन यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसिलदार मोहसिन शेख, निवासी नायब तहसीलदार महादेव कारंडे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्र व विद्यार्थ्यांना विविध आवश्यक दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

मंडळस्तरावर आयोजित शिबिरात जमीन महसूल, रहिवासी दाखले व वारस नोंदीचे फेरफार, तसेच वृद्धापकाळ, विधवा, अपंग योजना, उत्पन्न दाखले, जात प्रमाणपत्र, आधार लिंक व बेबी केअर किट, संजय गांधी निराधार योजना लाभार्थी मंजुरीचे आदेश, श्रावण बाळ योजना लाभार्थी मंजुरीचे आदेश, आरोग्य विभागाचे गोल्डन कार्ड वाटप, जन्म मृत्यु नोंदीचे दाखले, विवाह नोंदणी दाखले, संगणकीकृत सातबारा वाटप, सोसायटी इकरारबाबत फेरफार, कमी जास्त पत्रकाचे फेरफार भोगवटादार वर्ग-2 मधुन भोगवटादार वर्ग-1 करणे बाबत मंजुरी आदेश, शाळेतील मुलांना जातीचे दाखले, राष्ट्रीयत्वाचे दाखले, अधिवास प्रमाणपत्र, रेशनकार्डमध्ये नविन नाव समाविष्ट करणे, रेशनकार्ड मधील नाव कमी करणे, नविन / दुबार शिधा पत्रिकाबाबत अर्ज स्विकारणे यांसह विविध दाखले वाटप केले. आठवा पोषण पंधरवडा अंतर्गत जनजागृती करत विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अंगणवाडी सेविका व सहायकाने पौष्टीक आहाराचे महत्व सांगितले.

या कार्यक्रमास माजी सरपंच नितीन खेतमाळस, लहु वतारे, डॉ.विलास कवळे, राजेंद्र गोरे, संपत बावडकर, श्रीराम धस, धनंजय मते, बालविकास विभागाच्या सुडके मॅडम, मंडळ अधिकारी शेळके भाऊसाहेब, ग्राम महसूल अधिकारी सुखदेव कारंडे, अनुरूध खेतमाळस, दीपक व्यवहारे, पृथ्वी भांगे, अमृत लिंगडे, वैद्यकीय अधिकारी डॉ.हरिष दराडे, आरोग्य सहाय्यक शिंदे, आरोग्य सेवक सचिन गोरखे अक्षय जिरंगे, आशा सुपरवायझर श्रीमती.त्रिभुवन वैशाली यांच्यासह मिरजगाव मंडळातील सर्व आशा स्वयंसेविका, कृषी, भूमि अभिलेख कार्यालयाचे अधिकारी, परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कारंडे म्हणाले, पात्र लाभार्थ्यांना विविध योजनेचा लाभ मिळावा, यासाठी हे महाराजस्व अभियान वरदान ठरत असून याचा लाभ प्रत्येक नागरिकांनी घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# पुस्तकाचा प्रकाशन सोहळा दिमाखदार पद्धतीने साजरा




**ओतूर : (स. गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील ग्रामविकास मंडळाचे माजी अध्यक्ष श्री माधवराव भाऊसाहेब डुंबरे लिखित यशोगाथा उत्तमापूरची अर्थात ओळख ओतूरची या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवार दिनांक १८ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता पांढरी मारुती मंदिर खुले व्यासपीठ याठिकाणी दिमाखदार पद्धतीने पार पडला.

यावेळी सीमा सोनवणे, माजी आमदार दिलीपराव ढमडेरे, माजी आमदार अतुल बेनके, गणपतराव फुलवडे, जिल्हा परिषदेच्या सदस्या छाया तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, ह.भ.प. गंगाराम महाराज डुंबरे, शरद चौधरी, निलम तांबे, तुषार थोरात, धनंजय डुंबरे, रामदास तांबे, सुजित खैरे, पोपटराव नलावडे, संगीता वाघ, शिल्पा मोरे, रंगनाथ घोलप, ह.भ.प. हरड महाराज जेष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व स्व. झांबरशेठ तांबे यांच्या प्रतिमा पूजन माधवराव डुंबरे व हिराबाई डुंबरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर पुस्तकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी मनोगतातून माधवराव डुंबरे यांच्या कार्याचे कौतुक करत पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी छाया तांबे म्हणाल्या की, वयाच्या ९० व्या वर्षी पहाटे ३ वाजता उठून गावातील कार्यक्रम भव्य दिव्य स्वरूपात लिहिणे हा त्यांचा छंद होता. ही अभिमानास्पद गोष्ट आहे." सीमा सोनवणे म्हणाल्या, "पुणे ही महाराष्ट्राची राजधानी आहे. सत्यशोधक चळवळ याच भुमी ने दिले. ओतूर येथील सांस्कृतिक ठेवा या पुस्तकात आहे. हे पुस्तक आपल्या पवित्र भूमीचा गौरव आहे."

अतुल बेनके म्हणाले की, "हे पुस्तक अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. ओतूर भूमी ही पवित्र भूमी आहे. आदिवासी, ग्रामीण भागातील लोक ओतूर भूमीत येतात आणि येथील विचार घेऊन जातात. विचारांची श्रीमंती या पुस्तकात आहे." ओतूर नगरीचे ऋषींतुल्य व्यक्तिमत्व माधवराव भाऊसाहेब डुंबरे यांनी आपल्या वयाच्या ९० व्या वर्षी उत्तमापूर ते ओतूर असा रंजक ऐतिहासिक खुणाची साक्ष असणारा हा प्रवास, गेल्या एक-दीड वर्षापासूनचे अथक परिश्रम, अव्याहतपणे केलेले वाचन, चर्चा, तसेच त्यांनी प्रत्यक्ष अनुभवलेली व्यक्तिमत्व, त्यांचे जुने अनुभव हे या पुस्तकातून मांडले आहेत. या पुस्तकाच्या बांधणीसाठी ओतूरच्या ज्येष्ठ साहित्यिक डॉ. रश्मी घोलप, संपादकीय मंडळातील डॉ. भरत घोलप, सुनील वैद्य, शोभा टिकेकर, मंदाताई दांगट यांचे सहकार्य लाभले. अतिशय अभ्यासपूर्ण माहिती व सुंदर असं शब्दांकन असणार हे पुस्तकं नक्कीच शिवजन्मभूमीतील भावी पिढीला प्रेरणा देणार असल्याचे उपस्थित ग्रामस्थांनी सांगितले. प्रास्ताविक गंगाराम महाराज डुंबरे, सूत्रसंचालन विठ्ठल शितोळे यांनी केले. आभार दिपक डुंबरे यांनी मानले. उत्तमापूर म्हणजे ओतूर, पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील एक महत्वपूर्ण ऐतिहासिक गाव. अनेक ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार असणाऱ्या या पुण्यभूमीचा इतिहास खूप जुना व रंजक आहे. जगतगुरु संत तुकाराम महाराज यांचे गुरु बाबाजी चैतन्य महाराज यांची संजीवन समाधी, महर्षी व्यासस्पर्शीत कपर्दिकेश्वर मंदिर, महात्मा ज्योतिबा फुले यांचे सहकारी, सत्यशोधक भाऊ कोंडाजी डुंबरे यांची जन्मभूमी, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरु केलेली मुलींची चौथी शाळा, गावातील पुरातन अवशेष, इतिहासाची साक्ष असणाऱ्या गावातील तीन वेशी, घराघरात असणारे आड, मोकळ्या बखळी, जुने कलात्मक वाडे, अशा अनेक खुणांचा मागोवा या पुस्तकात संचित केलेला आहे.

ओतूर नगरीचे कोहिनुर हिरे सॉलिसीटर दास्ताने, जेष्ठ साहित्यिक, पत्रकार सदा डुंबरे, स्वातंत्र्य सैनिक नानासाहेब हांडे-देशमुख, कविवर्य शंकर वैद्य, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, आंतरराष्ट्रीय किर्तीचे चित्रकार सुभाष अवचट, दूरदर्शन वरील आमची माती, आमची माणसं कार्यक्रमाचे निर्माते अशोक डुंबरे, सुप्रसिद्ध साहित्यिक अनिल अवचट, प्रवचनकार बालयोगी महाराज, सरोजनी वैद्य, इतिहासकार ओतूरकर, अशा अनेक महान व्यक्तिमत्वाचा कार्याची माहिती व त्यांचा जीवनपट या पुस्तकात रेखाटला गेला आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## राहुल साठे यांच्या दमदार सादरीकरणाने रंगला जयंती महोत्सव

पुणे (स. गांवकरी) : छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बोपोडी येथे आयोजित संयुक्त जयंती महोत्सवात भीमगीतांनी वातावरण भारावून गेले. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.) यांच्या वतीने हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, बोपोडी येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात आंबेडकरी चळवळीतील लोकप्रिय गायक आयकॉन स्टार राहुल साठे आणि त्यांच्या टीमने सादर केलेल्या दमदार भीमगीतांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या जोशपूर्ण सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख डॉ. विजय खरे, समितीचे अध्यक्ष, उपमहापौर परशुराम वाडेकर, रिपब्लिकन पक्षाचे अविनाश कदम, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, संदीप धांडोरे आदी मान्यवर उपस्थित होते. "प्रथम तुज वंदना", "पिंपळाच्या पानावर पाहिले चित्र गौतमाचे", "सोनियांची उगवली सकाळ", "माझ्या भीमरायावानी सांगा पुढारी होईल का", "किती शोभला असता भीम नोटांवर", "माझ्या भीमाची पुण्याई", "जिवाला जीवाच दान", "भीमाची लेखणी", "नांदण नांदण नंदन" आणि "माझ्या भीमाच्या नावाचं" या गीतांनी संपूर्ण परिसरात उत्साहाची लहर निर्माण केली. याशिवाय "भले भले पुढारी करतात भीमाला सलाम" या गीतासह विविध सादरीकरणांना प्रेक्षकांकडून जोरदार प्रतिसाद मिळाला. ओमप्रकाश सोनवणे आणि अभिजीत भवर यांनीही आपल्या सादरीकरणातून कार्यक्रमात रंगत आणली.




## 'अथश्री'ला २५ वर्षे पूर्ण; ज्येष्ठ नागरिक निवासात नवा टप्पा

पुणे (स. गांवकरी) : परांजपे स्कीम्स (कन्स्ट्रक्शन) प्रा. लि. यांच्या 'अथश्री' या ज्येष्ठ नागरिक निवास उपक्रमाला २५ वर्षे पूर्ण झाली असून, या निमित्ताने वडोदरा येथे ६,००० व्या रहिवाशाला घराचा ताबा देण्याचा कार्यक्रम पार पडला. देशभरातील सुमारे १६ प्रकल्पांमधून ३,००० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांना निवास सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. कार्यक्रमात अध्यक्ष श्रीकांत परांजपे आणि व्यवस्थापकीय संचालक शशांक परांजपे यांनी 'अथश्री'च्या प्रवासाचा आढावा घेतला. यावेळी व्यवसाय विकास संचालक अमित परांजपे यांनी आरोग्यसेवा, वेलनेस आणि आपत्कालीन सुविधांमध्ये नव्या भागीदारींची घोषणा केली. 'अथश्री' प्रकल्पांतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य सुविधा, योग-फिटनेस कार्यक्रम, तसेच समुदायाधारित उपक्रम राबवले जाणार असून, स्वावलंबी आणि सन्मानाने जगण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. भारतामध्ये वाढती आयुर्मर्यादा आणि बदलती कुटुंबव्यवस्था लक्षात घेता, ज्येष्ठ नागरिक निवास क्षेत्र 'सिल्वर इकॉनॉमी'चा महत्त्वाचा भाग बनत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

## जागृत देवस्थान असलेली श्री राणूबाई माता यात्रेचा उत्सव सोमवारी



मंचर (स. गांवकरी) : लौकी ता. आंबेगाव येथील जागृत देवस्थान असलेली श्री राणूबाई माता यात्रेचा उत्सव सोमवार दि.२० रोजी संपन्न होत आहे. अशी माहिती ग्रामस्थांनी दिली. सकाळी पहाटे देवीच्या मूर्तीला अभिषेक, हारतुरे,मांडव डहाळे,कलशधारी महिलांची मिरवणूक,होम हवन,पूजा सकाळच्या सत्रात होणार आहे.त्यानंतर दुपारी शाहीर मारुती दाभाडे पिंपरखेड कलगीवाले, शिवशंभो गायन पार्टी चांडोली तुरेवाले शाहीर भरत थोरात यांचा कलगीतुऱ्याचा कार्यक्रम होणार आहे.सायंकाळी उपस्थित भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येत आहे.रात्री आठ वाजता भैरवनाथ प्रासादिक भजनी मंडळ लौकी यांचा भजनाचा कार्यक्रम पार पडणार आहे.अशी माहिती देवस्थानचे पुजारी सुनील गंगाधर पडवळ यांनी दिली आहे.श्री राणूबाई माता देवस्थान हे जागृत देवस्थान असून या ठिकाणी नवस फेडण्यासाठी पुणे,मुंबई शहर तसेच आंबेगाव,जुन्नर,खेड,शिरूर या चार तालुक्यातील विविध गावांमधून भाविक भक्त चैत्र आणि वैशाख महिन्याच्या दर मंगळवारी,शुक्रवारी आणि रविवारी येत असतात.असे लौकी गावचे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष निलेश थोरात यांनी सांगितले.सदर कार्यक्रमाचे नियोजन व्यवस्था पुजारी सुनील पडवळ,माजी सरपंच संदेश थोरात,पोपट थोरात,सुदाम काळे,अनिल थोरात यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी पाहतात.

## सखाराम पोखरकर यांचे निधन



मंचर (स. गांवकरी) : खडकी-पांढरीवस्ती (ता.आंबेगाव) येथील सखाराम बजाबा पोखरकर (वय ८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले.खडकी व पांढरीवस्ती या गावाच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा सहभाग होता. प्रगतिशील शेतकरी म्हणून ते परिचित होते. त्यांच्यामागे पत्नी,दोन मुलगे,मुलगी, नातवंडे,पतंवडे असा परिवार आहे.भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे संचालक व समाजसेवक दादाभाऊशेठ पोखरकर यांचे ते बंधू तर भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे लेखा विभागातील कर्मचारी व प्रयोगशील शेतकरी बाळासाहेब पोखरकर यांचे ते वडील होत.खडकी गावच्या पोलीस पाटील मंगल बाळासाहेब पोखरकर त्यांच्या त्या सुनबाई होत.

## पारगावच्या आखाड्यात सुरडे विजयी

**मंचर : (स. गांवकरी)**

पारगाव तर्फे खेड (ता. आंबेगाव) येथे मुक्ताई देवीच्या यात्रेनिमित्त राहुल फुलमाळी(ता. जुन्नर) व विजय सुरडे (ता.नाशिक) यांच्यामध्ये झालेली कुस्ती रंगतदार झाली. तब्बल १५ मिनिटे डाव प्रती डाव सुरु होते. सुरडे हे विजयी झाले. मुक्ताई केशर कुस्त्यांच्या आखाड्यात नामवंत शंभरहून अधिक पैलवानांनी भाग घेतला. चितपट झालेल्या कुस्त्यांना इनाम देण्याची गेल्या ७५ वर्षापासून येथे परंपरा आहे.त्यामुळे कुस्त्यांचा आखाडा रंगतदार झाला.विजेत्या पैलवानांना दोन लाख ८० हजार रुपयांची रक्कम विभागून देण्यात आली.कुस्त्या पाहण्यासाठी मोठा समुदाय उपस्थित होता. कुस्त्यांसाठी प्रशस्त मैदान यात्रा समितीच्या वतीने तयार करण्यात आले होते.राहुल फुलमाळी(ता. जुन्नर) व विजय सुरडे (ता.नाशिक) यांच्यामध्ये झालेली कुस्ती रंगतदार झाली.तबल१५ मिनिटे डाव प्रती डाव सुरु होते. सुरडे हे विजयी झाले.भरत चव्हाण (ता. खेड) व महेश फुलमाळी (ता. हवेली),राष्ट्रीय विजेते निलेश उचाळे (ता.पारनेर) विरुद्ध कृष्णा हरनवळ (ता.इंदापूर),क्रीशा काळे(ता.आंबेगाव) विरुद्ध श्रुती मुद्दमुले(जुन्नर), स्वरा गाडे(ता. आंबेगाव) विरुद्ध तन्वी रोकडे(ता. आंबेगाव) यांच्या ही अटीतटीच्या कुस्त्या झाल्या.आंबेगाव तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सचिन पानसरे व उद्योजक भाऊसाहेब सावंत पाटील , सुरेश भागडे,उत्तम पवार यांच्यासह ग्रामस्थांच्या उपस्थितीत कुस्त्यांच्या आखाड्याचा शुभारंभ झाला.पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य विष्णूकाका हिंगे पाटील व बाजार समितीचे सभापती निलेश थोरात यांनी आखाड्याला भेट देऊन पैलवानांचे कौतुक केले. शरद गाडे,नवनाथ भालेराव, संजय भागडे,रवींद्र पाबळे,गोरक्ष चिखले यांनी पंच म्हणून कामगिरी केली.सूत्रसंचालन अनिल धायबर यांनी केले.

# 'आदिनाथ इलेक्ट्रिकल्स'चा दिमाखदार शुभारंभ

## पत्रकारांनी व्यवसायासोबत निपक्ष व निर्भीड भूमिका जपावी – डॉ. विश्वासराव आरोटे

**ओतूर : (स. गांवकरी)**



जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जुन्नर तालुका अध्यक्ष नयन डुंबरे यांनी 'आदिनाथ इलेक्ट्रिकल्स' या नवीन व्यवसायाची उत्साहात सुरुवात केली. या व्यवसायाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. उद्घाटन प्रसंगी परिसरातील नागरिक, पत्रकार बांधव व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी मार्गदर्शन करताना पत्रकारितेचे महत्त्व आणि जबाबदारी अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, आजच्या स्पर्धात्मक युगात पत्रकारांनी केवळ पत्रकारितेवर अवलंबून न राहता स्वतःचा व्यवसाय किंवा उद्योग उभारणे गरजेचे आहे. दिवसभरात केवळ एक तास पत्रकारिता करून उर्वरित वेळ उदरनिर्वाहासाठी व्यवसायात गुंतवावा, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच पत्रकारितेत निपक्षपातीपणा, प्रामाणिकपणा आणि निर्भीडपणा राखणे अत्यंत आवश्यक असून कोणत्याही दबावाला बळी न पडता सत्य मांडणे हेच पत्रकाराचे खरे कर्तव्य आहे, असे त्यांनी नमूद केले. यासोबतच व्यस्त दिनक्रमातही कुटुंबाला वेळ देणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उद्घाटन समारंभात डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते नयन डुंबरे यांचा शाल, श्रीफळ, पेढे व ड्रेस देऊन सत्कार करण्यात आला. नवीन व्यवसायासाठी शुभेच्छा देत त्यांनी नयन डुंबरे यांना उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. नयन डुंबरे यांनीही उपस्थित मान्यवरांचे आभार मानत व्यवसाय उत्तम सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला. या कार्यक्रमास नवनाथ जाधव (कार्य संपादक, समर्थ गांवकरी), संजय फुलसुंदर (व्यवस्थापक, दैनिक समर्थ गांवकरी), संजय भाऊ गायकर (वृत्त संपादक, दैनिक समर्थ गांवकरी तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ अकोले तालुका संपर्कप्रमुख) यांच्यासह इतर पत्रकार व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला असून ओतूर परिसरात 'आदिनाथ इलेक्ट्रिकल्स'च्या शुभारंभामुळे नवीन व्यावसायिक सेवेला प्रारंभ झाला आहे. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत नयन डुंबरे यांना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

## "जय भीम" च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला !

**कर्जत : (स. गांवकरी)**



भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती माहिजळगाव चौफुला (ता. कर्जत) येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य अशोक खेडकर यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. येथील मुख्य चौकात डॉ.आंबेडकरांच्या भव्यदिव्य पुतळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर व भीमसैनिकांनी अभिवादन केले.

यावेळी "जय भीम" च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. जागोजागी कमानी, स्वागतफलक, विद्युत रोषणाई, झेंडे व भीमगीतांच्या सुरांनी वातावरण भारावलेले होते. शहरातील प्रमुख रस्ते, चौकात लावलेल्या शेकडो झेंड्यांमुळे वातावरण निळेमय झाले होते. या दरम्यान फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करण्यात आली.

खेडकर म्हणाले, शिक्षण हे वाघीणीचे दूध आहे. या मंत्रामुळे समाजात जागृती झाली आहे. तरूण पिढीने वेसनापासून दूर राहुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आठवावेत, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र केवळ घोषणांपुरता मर्यादित न ठेवता, तो प्रत्यक्ष सामाजिक प्रगतीसाठी आणि परिवर्तनासाठी आचरणात आणणे ही काळाची गरज आहे. समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वावर आधारित विचार समाजात रुजवूनच खऱ्या अर्थाने लोकशाही बळकट करता येईल, असे त्यांनी सांगितले.

तसेच कु.प्रांजल आनंद साळवे हिने तरूणांना प्रबोधन केले. व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनपटावर विशेष अशी माहिती परखडपणे मांडली.

याप्रसंगी अशोक खेडकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेवा भावी संस्थेचे सचिव प्रा.भिमराव साळवे, ॲड.आनंद साळवे, डॉ.शिवाजी शिंदे, बापुसाहेब शिंदे, अमोल बामणे, शाम बामणे, भानुदास डाडर, दादा डाडर, रमेश डाडर, महेश पाटील, निलेश जाधव, मनोज साबळे, संदीप साबळे, वैभव साबळे, राजेंद्र साबळे, विकी साळवे, अतुल साबळे, नवनाथ शिंदे, आभि साळवे, डॉ.तोरडमल, किरण साबळे, संतोष उदमले, अनुप पवार, स्वप्निल साबळे यांच्यासह भिमसैनिक, ग्रामस्थ, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे जिल्ह्यात रोजगाराच्या संधींचा मेळावा

**मंचर: (स. गांवकरी)**

(शॉर्ट टर्म एम्प्लॉयमेंट प्रोग्राम )अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थी तसेच इतर बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे यांच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यांमुळे जिल्ह्यातील नोकरी इच्छुक युवकांना विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.रोजगार मेळाव्यांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे-सोमवार दि.२० रोजी वीर फिरंगोजी नरसाळा शासकीय आयटीआय, वरवंड (ता. दौंड),मंगळवार दि.२१ रोजी मालोजीराजे भोसले शासकीय आयटीआय, इंदापूर,बुधवार दि.२२ रोजी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय आयटीआय, औंध, पुणे,गुरुवार दि.२३ रोजी शहीद राजगुरु शासकीय आयटीआय, खेड (राजगुरुनगर), सोमवार दि.२७ तात्या टोपे शासकीय आयटीआय, शिरूर या रोजगार मेळाव्यात पुणे जिल्ह्यातील नामांकित कंपन्या जसे की फियाट इंडिया ऑटोमोबाईल्स प्रा.लि., विशे कॉम्पोनंट्स इंडिया प्रा. लि., कुबेर कॉर्पोरेट, टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल लि., युनो मिंडा लि., ॲडको इंडिया, साई सिद्धी कॉर्पोरेशन, श्री होम अप्लायन्सेस ॲंड सर्व्हिसेस प्रा. लि. आदी कंपन्या सहभागी होणार आहेत.मेळाव्यातील नोकरीच्या संधी एसएससी, एचएससी, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर व पदव्युत्तर पात्रताधारक उमेदवारांसाठी खुल्या असून विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर भरती होणार आहे.अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१ रास्ता पेठ, पुणे येथे संपर्क साधावा किंवा 020-26133606 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.

# Wobble One चे पुणे पदार्पण : ग्राहक आणि इन्फ्लुएंसर्समध्ये अभूतपूर्व उत्साह

## केंशा मोबाईल्स, धनोरी येथे Wobble One च्या शहरातील पहिल्या अनावरण सोहळ्यात उसळली गर्दी

**पुणे : (स. गांवकरी)**




Wobble — भारतीय ग्राहक तंत्रज्ञान ब्रँड जो आपल्या धाडसी डिझाईन तत्त्वज्ञान आणि कामगिरी-केंद्रित अभियांत्रिकीसाठी ओळखला जातो — आज आपला प्रमुख स्मार्टफोन Wobble One पुण्यात घेऊन आला. केंशा मोबाईल्स, धनोरी येथे शहरातील पहिले लाइव्ह अनावरण झाले, ज्यात ग्राहक, कंटेंट क्रिएटर्स आणि स्थानिक इन्फ्लुएंसर्सचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उपस्थितांनी Wobble One चा सेगमेंट-डिफायनिंग कॅमेरा सिस्टम, AI-पॉवर्ड फोटोग्राफी, Dolby Vision डिस्प्ले आणि फ्लॅगशिप-दर्जाची कामगिरी प्रत्यक्ष अनुभवली. पुण्याच्या अनावरण सोहळ्याला शहराच्या कानाकोपऱ्यातून मोठी आणि उत्साही गर्दी जमली. पहिल्यांदाच स्मार्टफोन अपग्रेड करू पाहणाऱ्यांपासून ते अनुभवी कंटेंट क्रिएटर्स आणि डिजिटल-फर्स्ट तरुणांपर्यंत — केंशा मोबाईल्स, धनोरी दिवसभर शोध आणि उत्साहाचं केंद्र बनलं. सोहळ्यात सहभागी झालेले इन्फ्लुएंसर्स पुण्यात Wobble One प्रत्यक्ष हातात घेऊन अनुभवणारे पहिले ठरले — 50MP Creator's Eye फ्रंट कॅमेऱ्याची 4K HDR इमेजिंग तपासली आणि या फोनची ताकद थेट जाणून घेतली. स्टोअरमधील वातावरण या प्रॉडक्टच्या स्वभावाचं थेट प्रतिबिंब होतं — एक असा फोन जो ग्राहकांना कामगिरी, डिझाईन आणि किमतीमध्ये तडजोड करायला भाग पाडत नाही. आलेले सर्वजण हे ठामपणे जाणून गेले की Wobble One हा या सेगमेंटमधील सर्वाधिक क्रिएटर-फर्स्ट पर्याय का आहे.Wobble One चा आधार एक ट्रिपल रियर कॅमेरा सिस्टम आहे. त्याचं नेतृत्व Sony LYTIA 600 सेन्सर, Optical Image Stabilisation (OIS) आणि 4K HDR व्हिडिओ व इमेज क्षमता असलेला 50MP मेन कॅमेरा करतो — एक असं स्मार्ट इमेजिंग इंजिन जे शूटिंगच्या प्रत्येक परिस्थितीशी जुळवून घेतं आणि कोणत्याही वातावरणात स्पष्ट, स्थिर व वास्तवदर्शी छायाचित्रे देतं. 8MP Ultra-Wide Bokeh लेन्स विस्तृत दृश्ये टिपतो, तर 2MP Macro लेन्स सूक्ष्म तपशीलांना जवळून टिपतो. समोरील कॅमेऱ्यात 4K HDR इमेजिंग आणि व्हिडिओसह 50MP Creator's Eye कॅमेरा या सेगमेंटमध्ये पहिल्यांदाच या पातळीची फ्रंट-कॅमेरा कामगिरी देतो — भारतातील रीलर्स, व्लॉगर्स आणि कंटेंट-फर्स्ट ग्राहकांसाठी विशेषतः घडवलेला.

संपूर्ण इमेजिंग सिस्टम AI-पॉवर्ड फोटोग्राफी आणि व्हिडिओग्राफी क्षमतांशी सखोलपणे जोडलेला आहे — ज्यात AI Best Take, AI Scene Recognition, AI Beauty, Portrait Aberration Correction, Video Portrait Bokeh, Super Resolution, Selfie Night Shot, Selfie HDR, AI Ultra HD Portrait (Super Night), Super Night (RAW), AI Snap Mode (Photo Deblur) आणि Super Video Stabilisation यांचा समावेश आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## खेलोमोर तर्फे खेळाच्या ठिकाणांच्या बुकिंगमध्ये लक्षणीय वाढ

पुणे (स. गांवकरी) : खेळासाठीची ठिकाणे शोधण्यासाठी आणि बुक करण्यासाठी आघाडीचे व्यासपीठ असलेल्या खेलोमोर ने पुण्यातील मैदान बुकिंगमध्ये लक्षणीय वाढ झाल्याची घोषणा केली आहे. सध्या पुण्यात त्यांच्याकडे सुमारे २३४ ठिकाणे उपलब्ध आहेत. ही वाढ चांगले आरोग्य व तंदुरुस्तीकरिता सक्रिय जीवनशैलीची वाढती संस्कृती दर्शवते, तसेच परिसरात सुलभ आणि उच्च दर्जाच्या क्रीडा सुविधांची वाढती मागणीही अधोरेखित करते. गेल्या काही महिन्यांत खेलोमोरने पुण्यात वापरकर्त्यांच्या सक्रियतेत लक्षणीय वाढ नोंदवली आहे. खेळाडू आणि क्रीडाप्रेमी फुटबॉल, क्रिकेट, बॅडमिंटन यांसारख्या विविध खेळांसाठी मैदाने, टर्फ्स आणि कोर्ट्स बुक करण्यासाठी वाढत्या प्रमाणात या प्लॅटफॉर्मचा वापर करत आहेत.




## मानवी मूल्यांसाठी प्रबोधन हाच परिवर्तनाचा मार्ग - प्रा. सचिन झगडे

श्रीरामपूर (स. गांवकरी) : "शत्रू आणि मित्राची खरी ओळख पटणे म्हणजेच जागृतीची सुरुवात होय. समाजात अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आणि मानवी मूल्यांचे रक्षण करण्यासाठी प्रबोधन होणे ही आजच्या काळाची गरज आहे," असे स्पष्ट मत सत्यशोधक विचारवंत प्रा. सचिन झगडे यांनी व्यक्त केले. महामानव विचार प्रबोधन समितीच्या वतीने महात्मा जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित जाहीर व्याख्यानात ते बोलत होते. श्रीरामपूर येथील सहर्षा हॉलमध्ये रविवारी हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. प्रा. झगडे म्हणाले, "जागृतीमुळे माणसाच्या विचारांमध्ये आणि आचरणात बदल घडतो, आणि त्यातून समाजपरिवर्तन शक्य होते. कोणतीही राजकीय क्रांती यशस्वी व्हायची असेल, तर आधी सामाजिक क्रांती घडणे आवश्यक आहे." त्यांनी पुढे आवाहन केले की, "फुले-आंबेडकरांच्या विचारांचे आपण सुकाणू बनून हे कार्य 'मिशन' म्हणून पुढे नेले, तर प्रबोधनाचा दीप कायम प्रज्वलित राहील." कार्यक्रमाचे उद्घाटन अपंग सामाजिक विकास संस्थेचे संस्थापक प्रा. संजय साळवे यांच्या हस्ते झाले. सुरुवातीला बाल व्याख्याती सांची मोहन हिने प्रभावी भाषणातून वातावरण भारावून टाकले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश मकासरे यांनी केले, तर सूत्रसंचालन राजेश हिवाळे यांनी केले. शेवटी ॲड. प्रज्ञा बागुल यांनी उपस्थितांचे आभार मानले.



## ना. विखे पाटील यांच्या निधीतून हरेगावचा विकास करू - पटारे -

वडाळा महादेव (स. गांवकरी) : पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील हे अनेक विकास कामे पूर्ण करीत असून हरेगाव चा विकास देखील त्यांच्या निधीतून गावचे सरपंच दिलीप त्रिभुवन यांच्या माध्यमातून करू असे प्रतिपादन पंचायत समितीचे माजी सभापती दीपक पटारे यांनी जॉगिंग ट्रॅक शुभारंभ प्रसंगी केले. ना. विखे पाटील यांच्या निधीतून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात पेव्हिंग ब्लॉक चे जॉगिंग ट्रॅक व ब्राह्मणगाव फाटा ते शिव मारुती मंदिर स्ट्रीट लाईट कामाचा शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार लहुजी कानडे हे होते. यावेळी बाजार समिती चे संचालक गिरीधर आसने, डॉ. शंकरराव मुठे, भाऊसाहेब बांद्रे,अशीभाई पोपटीया, सरपंच दिलीप त्रिभुवन, ग्रामपंचायत सदस्य रमेश भालेराव, दीपक नवगिरे, अशोक बोधक, काशिनाथ जगताप, आर के गोरे, गुलाबराव पठारे, भाऊसाहेब व्हसाले, मिलिंद मोरे, सुनील ओहोळ, नानाभाऊ काटे, संजय भनगडे, हरीश मढीकर, अशोक शरणागते , आशिष शिंदे, राजेंद्र देशमुख, अलेक्झ दुशिंग, आदी सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सुनील पवार यांनी आभार मानले.

## जुन्नर नवीन एसटी स्टँड येथे जुन्नर ते ठाणे बसने घेतला अचानक पेट

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर नवीन एसटी स्टँड येथे जुन्नर ते ठाणे बस क्र. एम एच २० / जी सी / ४७८७ , शुक्रवार , दिं १७ एप्रिल दुपारी २ वाजून ३० मि. अचानक पेट घेतला . यावेळी बस मध्ये प्रवासी नसल्याने मोठा अनर्थ टाळला . याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की , बस स्थानक फलट क्र.२ दोन वर बस बंद करून उभी होती . चालक गणेश शंकर लवाटे चा. क्र. २९३३ बसची नोंद करण्यासाठी तर वाहक सुरेश रामचंद्र वंडेकर वा. क्र. ५९३८७ आरक्षण मेमो आणण्यासाठी वाहतूक नियंत्रण कक्षेत आले . यावेळी बसच्या समोर उभ्या असणाऱ्या प्रवाशांनी बसचे केबिन मधून धूर येत असल्याने ओरडा ओरडा सुरू केली . बस स्थानकावरील सर्व चालक व वाहतूक नियंत्रण यांनी बस स्थानकावरील अग्निशमन उपकरण व पाण्याच्या बादल्या घेऊन चालक व प्रवासी दरवाजा उघडून आग विझवण्याचा आटोक्यात प्रयत्न केला. याप्रसंगी जुन्नर नगरपरिषद अग्निशमन बंब घटनास्थळी आल्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. सदर घटनेत बसची १, लाख २५ हजार रुपये चे नुकसान झाले आहे असे संबंधित अधिकारी यांच्याकडून माहिती सांगण्यात आली.

# 'लोककला दर्शन' कार्यक्रमाने संयुक्त जयंती महोत्सवाचा समारोप

## महात्मा फुले आणि महामानव डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेने हे वर्ष सामाजिक सुधारणांचे वर्ष ठरावे : परशुराम वाडेकर

पुणे : (स. गांवकरी)

यंदाचे वर्ष क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जन्मद्वीशताब्दी आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे शताब्दी वर्ष आहे. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन हे वर्ष सामाजिक सुधारणांचे वर्ष ठरावे, अशी अपेक्षा उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी व्यक्त केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने साजऱ्या करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाच्या समारोप प्रसंगी वाडेकर बोलत होते. औंध बोपोडी परिसरातील महापालिकेच्या खेडेकर रुग्णालयात डायलिसिस,



फिजिओथेरपी, मुलांसाठी आयसीयू अशा अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज झाले असून आगामी काळात शेवाळे रुग्णालयात कर्करोग आणि दंत रोगावर उपचारांच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्याचप्रमाणे संजय गांधी रुग्णालयाच्या खाजगीकरणाचा डाव उधळून लावला गेला असून कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी निधीच्या माध्यमातून या रुग्णालयाचे देखील आधुनिकीकरण केले जाणार आहे, अशी घोषणा आहे वाडेकर यांनी यावेळी केली. या कार्यक्रमात डॉ. झिब्रा इस्रायल यांचा त्यांच्या सामाजिक कार्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. औंध बोपोडी परिसरातील महापालिका रुग्णालयांमध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात डॉ. इस्रायल यांचे मोलाचे योगदान आहे. रोटरी क्लब ऑफ पुणे डाउन टाउनच्या त्या असिस्टंट गव्हर्नर असून या माध्यमातून देखील त्यांनी केवळ औंध बोपोडी परिसरातच नव्हे तर संपूर्ण पुणे शहरात वैद्यकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. आपल्या कार्यामध्ये माजी उपमहापौर सुनीता वाडेकर व विद्यमान उपमहापौर परशुराम वाडेकर यांचे मोलाचे सहकार्य असून या पुढील काळातही समाजासाठी योगदान देण्याचा आपला प्रयत्न राहील, असे डॉ. इस्राएल यांनी यावेळी नमूद केले.

महोत्सवाच्या समारोपानिमित्त "लोककला दर्शन" या कार्यक्रमाचे विशेष आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात भाकरी गीत, पोतराज, शेतकरी गीत, भारुड, लावणी, शाहिरी, भीम किर्तीचा पोवाडा, जागरण गोंधळ अशा विविध लोककलांचे दर्शन कलाकारांनी प्रभावीरीत्या घडवले. रसिकांनी या कलांचा मोठ्या उत्साहाने आस्वाद घेतला.

# महात्मा बसवेश्वर यांची अक्षय' विचारधारा सर्वात प्रभावी

वडाळा महादेव : (स. गांवकरी)

क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वरांचा जन्म अक्षय तृतीयेला झाला.त्यांचे जीवन व कार्य ( इ. स.११०५ ते इ.स. ११६५) संपूर्ण मानवजातीला दिशादर्शक असून त्यांची अक्षय विचारधारा जपण्यातच मानवतेचे कल्याण असल्याचे मत वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक, अध्यक्ष डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी व्यक्त केले. श्रीरामपूर येथील बोरावके नगरमधील विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठान कार्यालयात क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर यांच्या ८९५ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबुराव उपाध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्रारंभी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला डॉ. उपाध्ये यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी सुखदेव सुकळे,संजय बुरकुले, सौ.सुरेखा बुरकुले, संकेत बुरकुले, सुयोग बुरकुले,सौ. वैष्णवी बुरकुले इत्यादींनी महात्मा बसवेश्वर व स्व. सौ. पुष्पाताई सुखदेव सुकळे यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानचे संस्थापक, सचिव सुखदेव सुकळे यांनी डॉ. उपाध्ये यांना श्रमप्रतिष्ठा व प्रतिष्ठान कार्य पुस्तिका देऊन स्वागत केले. प्रास्ताविक मनोगतात श्री सुकळे यांनी सांगितले की, गेल्या पाच वर्षापासून अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्वर यांची जयंती एक समाजप्रबोधक उपक्रम म्हणून साजरी केली जाते.

श्रीचक्रधर स्वामी, श्रीसंत ज्ञानेश्वर आणि संत परंपरेच्या आधी महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक समतेचा आणि स्त्रीपुरुष सन्मानाचे विचार मांडून क्रांतीविचार मांडले. ही विचारधारा आचरणात आणणे गरजेचे असल्याचे सांगून डॉ. उपाध्ये यांचा परिचय करून दिला. डॉ. उपाध्ये यांनी 'शोधः साहित्य बोध' हा ग्रंथ सुखदेव सुकळे यांना भेट देऊन या पुस्तकातील महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन,कार्यलेखाचा आढावा घेतला.

# 'हिमालया बेबीकेअर'तर्फे 'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट'चे आयोजन

पुणे : (स. गांवकरी)

हिमालया बेबीकेअर या भारतातील आघाडीच्या व लोकप्रिय बेबीकेअर ब्रँडने स्माईल फाउंडेशनच्या सहकार्याने पुण्यात 'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट' नुकतीच आयोजित केली. या उपक्रमात माता, त्यांची बाळे, समुदाय आरोग्य कर्मचारी आणि बालसंगोपन तज्ज्ञ एकत्र आले होते. बालकांचा सर्वांगीण विकास, मातांचे आरोग्य आणि बालसंगोपनाच्या सुरुवातीच्या पद्धती यांबाबत जनजागृती करण्याचा या उपक्रमाचा उद्देश होता. या स्पर्धेत १३०हून अधिक मातांनी आणि त्यांच्या बाळांनी उत्साहाने भाग घेतला. आरोग्य तज्ज्ञ आणि 'स्माईल फाउंडेशन'ची प्रोग्रॅम टीम यांनीही या उपक्रमाला पाठिंबा दिला. संपूर्ण वातावरण उत्साही आणि समाजाभिमुख होते. त्यातून मातांचे व बालकांचे आरोग्य सुधारण्याबाबत समाजात मोठी उत्सुकता असल्याचे दिसून आले. स्पर्धेदरम्यान बाळांच्या हालचालींची कौशल्ये, त्यांची उंची, वजन आणि



'स्माईल फाउंडेशन'च्या 'स्वाभिमान' आणि 'एम्पॉवरिंग ग्रासरूट्स' या उपक्रमांच्या प्रमुख सरिता प्रधान म्हणाल्या, "स्माईल फाउंडेशनच्या 'स्वाभिमान' उपक्रमांतर्गत आम्ही सामुदायिक स्तरावर मातांचे आणि बालकांचे आरोग्य बळकट करण्यावर लक्ष देतो. बाळांचे लहान वयातील योग्य पोषण, त्यांची काळजी आणि त्यासंदर्भात पालकांची जागृती यांतून दोघांच्याही आयुष्यावर सकारात्मक परिणाम होत असतो.

सक्रियता अशा महत्त्वाच्या विकास घटकांवर मूल्यमापन करण्यात आले. हिमालया बेबीकेअर आणि स्माईल फाउंडेशन यांनी संयुक्तपणे या 'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट'चे विजेते जाहीर केले. अंकित बराणे आणि कियारा गणेश बडगुजर यांना प्रथम क्रमांक देण्यात आला. वैष्णव एरंडे आणि शिव आकाश राठोड यांना दुसरा क्रमांक, तर स्वरा पाटील आणि संघमित्रा जगदीश खोब्रागडे यांना तिसरा क्रमांक देण्यात आला. सर्व विजेत्यांना विशेष प्रमाणपत्र आणि हिमालया बेबी गिफ्ट पॅक देण्यात आला. तसेच सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र, माइलस्टोन बुकलेट आणि हिमालया बेबीकेअर सॅम्पल पॅक असलेली गूडी बॅग देण्यात आली. विकासाच्या मूल्यमापनासोबतच या प्रसंगी मातांना स्तनपान, बाळांचे पोषण, स्वच्छता, लसीकरणाचे वेळापत्रक आणि शिशूसंगोपन यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अशा प्रकारे माहितीपूर्ण आणि निरोगी पद्धतीने बाळांची काळजी घेण्याचे महत्त्व सर्वांच्या लक्षात आले. या उपक्रमाबाबत 'हिमालया वेलनेस कंपनी'चे बेबीकेअर विभागाचे संचालक चक्रवर्ती एन. व्ही. म्हणाले, "बाळाच्या वाढीसाठी आणि विकासासाठी सुरुवातीची वर्षे अत्यंत महत्त्वाची असतात. 'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट'च्या माध्यमातून पालकांना वैद्यकीय मार्गदर्शन आणि उपलब्ध साधने देण्याचा आमचा उद्देश आहे; जेणेकरून बाळाच्या आरोग्याची मजबूत पायाभरणी ही सुरक्षितता आणि विश्वास यांच्या आधारे होईल. स्थानिक समुदाय संस्थांसोबत भागीदारी करून आम्ही तळागाळातील कुटुंबांपर्यंत पोहोचत आहोत. प्रत्येक बाळाची सौम्यपणे, सुरक्षितपणे आणि माहितीपूर्ण आधारावर काळजी घेण्याचा संदेश आम्ही देत आहोत."

# दररोज ॲन्टॅसिड घेणे ठरू शकते धोकादायक

हैदराबाद : (स. गांवकरी)

जड अन्नानंतर छातीत जळजळ, आम्लपित्त किंवा पोटात अस्वस्थता जाणवताच ॲन्टॅसिडची गोळी घेण्याची सवय अनेकांना लागली आहे. सहज उपलब्ध असल्यामुळे या गोळ्या दैनंदिन जीवनाचा भाग बनल्या आहेत. मात्र, ही सवय दीर्घकाळ कायम राहिल्यास आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात, असा इशारा मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या तज्ज्ञांनी दिला आहे.

वर्ल्ड लिव्हर डेच्या पार्श्वभूमीवर तज्ज्ञांनी स्पष्ट केले की, केवळ लक्षणे दाबण्याऐवजी त्यामागील मूळ कारण शोधणे अत्यावश्यक आहे. भारतातील निम्म्याहून अधिक रुग्णांना आयुष्यात कधीतरी ॲन्टॅसिड दिले जाते, मात्र त्यापैकी सुमारे ३० टक्के लोक हे औषध आवश्यकतेपेक्षा जास्त काळ घेत राहतात. अनेकजण डॉक्टरांचा सल्ला न घेता थेट औषधे घेत असल्याचेही दिसून येते.

तज्ज्ञांच्या मते, पोटातील आम्ल



वर्ल्ड लिव्हर डे निमित्त तज्ज्ञांचा इशारा

हे केवळ अन्न पचनासाठीच नव्हे, तर शरीराला आवश्यक खनिजे आणि जीवनसत्त्वे शोषण्यासाठीही महत्त्वाचे असते. ॲन्टॅसिडच्या दीर्घकालीन वापरामुळे हे आम्ल कमी होत असल्याने शरीरातील पोषक घटकांची कमतरता निर्माण होते.

यामुळे मॅग्नेशियम आणि पोटॅशियमची कमतरता होऊन स्नायूंमध्ये गोळे येणे, अशक्तपणा तसेच हृदयाच्या ठोक्यांमध्ये अनियमितता दिसू शकते. आयर्न आणि व्हिटॅमिन बी-१२ कमी झाल्यास ॲनिमिया, सतत थकवा आणि मज्जासंस्थेशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. वयस्कर व्यक्तींमध्ये हाडे कमकुवत होऊन फ्रॅक्चरचा धोका वाढतो, तर काही प्रकरणांमध्ये किडनीवरही परिणाम होऊ शकतो. सतत थकवा, पायात गोळे येणे, चक्कर येणे, हृदयाचे ठोके वाढणे, हातपाय सुन्न होणे, केस गळणे किंवा ॲनिमियाची लक्षणे दिसल्यास ती दुर्लक्षित करू नयेत, असा सल्ला देण्यात आला आहे. गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. इशा बन्सल यांनी सांगितले की, "ॲन्टॅसिड योग्य पद्धतीने आणि मर्यादित कालावधीसाठी घेतल्यास उपयुक्त आहेत. मात्र, दीर्घकाळ विनासल्ला वापरल्यास खनिजांची कमतरता, ॲनिमिया आणि हाडे कमकुवत होण्याच्या समस्या वाढतात. त्यामुळे वेळोवेळी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे."

तज्ज्ञांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय ४ ते ८ आठवड्यांपेक्षा जास्त काळ ॲन्टॅसिड घेऊ नये. दीर्घकाळ औषध घेत असल्यास वैद्यकीय तपासणी करून घ्यावी. तसेच हृदय, मधुमेह किंवा इतर आजारांसाठी औषधे घेत असल्यास सर्व औषधांची माहिती डॉक्टरांना देणे गरजेचे आहे.

# हृदयविकाराच्या झटक्याबाबतचे सामान्य गैरसमज दूर करण्याचे ध्येय

मुंबई : (स. गांवकरी)

प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या झी टीव्हीच्या 'तुम से तुम तक' या मालिकेत आता हृदयविकाराच्या झटक्याभोवती असलेल्या गैरसमजांवर भाष्य करणारा नवा ट्रॅक सादर करण्यात येत आहे. सामाजिक भान जपत अर्थपूर्ण कथानक मांडण्याची परंपरा पुढे नेत, या मालिकेद्वारे महत्त्वाचा आरोग्यविषयक संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आगामी भागांमध्ये आर्यवर्धन (शरद केळकर) याला हृदयविकाराचा झटका येतो आणि कथानकाला नवे वळण मिळते. साधारणपणे अशा प्रसंगांना 'सगळे संपले' या भीतीदायक दृष्टिकोनातून दाखवले जाते. मात्र, या मालिकेतून हृदयविकाराचा झटका म्हणजे आयुष्याचा शेवट नसून, तो एक इशारा आहे, असा सकारात्मक आणि वास्तववादी दृष्टिकोन मांडण्यात येत आहे. समाजात



- हृदयविकाराच्या झटक्यावरील गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न; 'तुम से तुम तक' मालिकेचा नवा ट्रॅक चर्चेत

हृदयविकाराच्या झटक्याबाबत अनेक गैरसमज पसरलेले आहेत. 'झटका आला की व्यक्ती पूर्वीसारखे आयुष्य जगू शकत नाही', 'आयुष्य मर्यादित राहते', 'शारीरिक ताकद संपते' अशा भीतीमुळे अनेकदा रुग्ण आणि कुटुंबीयांमध्ये अनाठायी घबराट निर्माण होते.

# शिवसेना सर्वसामान्य लोकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर

## उद्योगमंत्री उदय सामंत यांचे प्रतिपादन; धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षाचे उद्घाटन

पुणे : (स. गांवकरी)

"सर्वसामान्य माणसाच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी वेळोवेळी त्यांना मदतीचा हात देण्याचा धर्म शिवसेना पक्षाने पाळलेला आहे. धर्मवीर आनंद दिघे अखेरच्या श्वासापर्यंत सामान्यांसाठी कार्यरत होते. त्यांच्याच नावाने शिवसेना नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष' ही लोकचळवळ सुरु झाली आहे. पुण्यातील नागरिकांना या कक्षाचा चांगला लाभ होईल व शिवसेनेची सामान्य लोकांप्रती असलेली बांधिलकी अधिक घट्ट होईल," असे प्रतिपादन उद्योग तथा




मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी केले. अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तवर धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षाचे राज्य प्रमुख व शिवसेनेचे राज्य निवडणूक समन्वयक वैभव वाघ यांच्या पुढाकाराने धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षाचे उद्घाटन सामंत यांच्या हस्ते झाले. सारसबागेजवळील शिवसेना भवनात आयोजित या कार्यक्रमावेळी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, शहरप्रमुख प्रमोद उर्फ नाना भानगिरे, सहसंपर्क प्रमुख अजय भोसले, रमेश कोंडे, सुधीर कुरूमकर, आबा बागुल यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिवसैनिकांचा गौरव करण्यात आला. तसेच ठाण्यातील टेम्भीनाक्यावरील देवीचे पूजन व शासकीय योजनांची दहीहंडी फोडण्यात आली. उदय सामंत म्हणाले, "शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील लोकांना मिळावा, यासाठी प्रत्येक शिवसैनिकाने पुढे यावे. सहायता कक्षाची चळवळ गावागावात पोहोचावी, यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत. अशा उपक्रमांतून समाज तर घडतोच, पण तुमच्यातील नेतृत्वही विकसित होते. चांगले काम करणाऱ्या लोकांच्या पाठीशी शिवसेना नेहमीच उभी राहते. वैभव वाघ यांच्यासारख्या उमद्या तरुणाच्या पुढाकारातून पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रात हा उपक्रम प्रभावीपणे राबविला जाईल, असा विश्वास आहे." डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, "शासनामार्फत विविध योजना, आरोग्यसुविधांसाठी सहायता निधी उपलब्ध असतो. मात्र, माहितीच्या अभावाने अशा योजना सामान्यांपर्यंत पोहोचत नाहीत. या योजना गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी आज सुरु होत असलेल्या या धर्मवीर आनंद दिघे नागरी सहायता कक्षाची मोठी मदत होईल. अडचणीच्या काळात मदतीचा हात मागण्यासाठी येणाऱ्या लोकांना शिवसेना भवन हे दिघे साहेबांच्या आनंदाश्रमाप्रमाणे वाटावे, असे कार्य आपण सर्वांनी येथून करायला हवे." प्रास्ताविकात वैभव वाघ यांनी सांगितले की, शासकीय योजनांचा अक्षय्य ठेवा जनसामान्यांपर्यंत पोहचवत, तसेच लोकहिताचे काम करत पुणे शहरातील शिवसेना भवनाला आनंद दिघे यांच्या विचारांचा 'आनंदाश्रम' बनवायचा आहे. मागेल त्याला मदत आणि प्रत्येकाच्या समस्यांचे निराकरण या दिघे साहेबांच्या संस्काराला अनुसरून अखंड काम सुरु राहील.